गुरुवार, २८ एप्रिल २०२२

# राम प्रहर

◆ वर्ष १४ ◆ अंक २८०
www.ramprahar.com

◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## अंतरंग

अंत्योदय मोहिमेत रायगडचा समावेश/२
पडसरे पूल मोजतोय अखेरची घटका/७
जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेत कुर्डुस संघ विजेता/८

### राज्यात पुन्हा मास्कसक्ती करावी; जिल्हाधिकाऱ्यांची मागणी



**मुंबई :** कोरोना रुग्णांच्या संख्येत वाढ होत असल्याने राज्यात पुन्हा मास्कसक्ती करावी, अशी मागणी सर्व जिल्ह्यांच्या जिल्हाधिकाऱ्यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याकडे केली आहे. राज्यातील्या वाढत्या कोरोना रुग्णांसंदर्भात बुधवारी (दि. २७) मुख्यमंत्री आणि सर्व जिल्ह्यांच्या जिल्हाधिकाऱ्यांची बैठक झाली. या बैठकीत मास्कच्या विषयावर चर्चा झाली. या वेळी नागरिकांमध्ये मास्क लावण्यासंदर्भात जनजागृती करण्याचे ठरले. गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर राज्य सरकारने महाराष्ट्रात मास्कमुक्तीची घोषणा केली होती. मास्कचा वापर ऐच्छिक करण्यात आला, मात्र कोरोनाची वाढती संख्या पाहता कोविड टास्क फोर्सने चित्रपटगृहे, नाट्यगृहे, सभागृहे, मॉल्स अशा गर्दीच्या बंदिस्त ठिकाणी मास्क वापराची सक्ती करण्याचा सल्ला दिला आहे. या पार्श्वभूमीवर गर्दीच्या ठिकाणी मास्कसक्ती करण्याचा विचार सरकार करीत आहे.

महाविकास आघाडी सरकारला धक्का

# मंत्री बच्चू कडूंवर गुन्हा दाखल

**रस्त्यांच्या कामामध्ये निधीचा अपहार केल्याचा आरोप**

**अकोला : प्रतिनिधी**

महाविकास आघाडी सरकारमधील राज्यमंत्री आणि अकोला जिल्ह्याचे पालकमंत्री बच्चू कडू यांच्यावर शहर कोतवाली पोलीस ठाण्यात विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जिल्ह्यातील रस्ते कामात अपहार केल्याची तक्रार वंचित बहुजन आघाडीचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ.




धैर्यवर्धन पुंडकर यांनी दिली होती. त्या तक्रारीवर न्यायालयाच्या आदेशानुसार कारवाई करीत मंत्री कडूंवर बुधवारी (दि. २७) गुन्हा दाखल झाला. त्यामुळे खळबळ उडाली आहे.

जिल्हा परिषदेकडून नियोजन समितीकडे पाठवलेल्या रस्त्याच्या कामाच्या प्रस्तावांमध्ये परस्पर बदल करून अस्तित्वात नसलेल्या रस्त्यांच्या नावे नियोजन समितीचे अध्यक्ष पालकमंत्री बच्चू कडू यांनी एक कोटी ९५ लाख रुपयांच्या निधीचा अपहार केल्याची तक्रार वंचित बहुजन आघाडीच्या वतीने दाखल करण्यात आली होती, मात्र पोलिसांनी कारवाई न केल्याने डॉ. पुंडकर यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता १५६ (३) अंतर्गत अकोला न्यायालयात प्रकरण दाखल केले. पालकमंत्री लोकसेवक असल्याने गुन्हा दाखल करण्यासाठी ९० दिवसांच्या आत राज्यपालांची परवानगी घेण्याचे आदेश न्यायालयाने दिले होते. दरम्यान, वंचितच्या नेत्यांनी राज्यपालांची भेट घेऊन या प्रकरणात लक्ष घालण्याची विनंती केली. राज्यपालांनी कायद्यानुसार दस्तऐवज सादर करण्याचे त्यांना सांगितले तसेच नियमानुसार कारवाई करण्याचे आदेशही प्रशासनाला दिले होते. या प्रकरणात अखेर गुन्हा दाखल झाला आहे. त्यामुळे मंत्री कडू यांच्या अडचणीत वाढ झाली आहे.

# देशहितासाठी सहा महिन्यांनी का होईना व्हॅट कमी केला पाहिजे

## पंतप्रधान मोदींनी इंधन दरांवरून सुनावले



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

देशात कोरोना रुग्णसंख्या वाढत असल्याने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बुधवारी (दि. २७) सर्व राज्यांच्या मुख्यमंत्र्यांसोबत आढावा बैठक घेतली. व्हिडीओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून झालेल्या या बैठकीत पंतप्रधान मोदींनी इंधन दरांवरून महाराष्ट्रासह काही राज्यांना सुनावले आहे. पंतप्रधानांनी इंधनावरील मूल्यवर्धित कर (व्हॅट) कमी न करणाऱ्या राज्यांची थेट नावेच घेतली आणि खडे बोल सुनावले. देशहितासाठी सहा महिन्यांनी का होईना व्हॅट कमी केला पाहिजे, असे ते म्हणाले.

इंधनाच्या वाढत्या दरांचे ओझे देशवासीयांवर पडू नये यासाठी केंद्र सरकारने गेल्या नोव्हेंबर महिन्यात अबकारी कर कमी केला होता. केंद्राने राज्यांनाही कर कमी करीत नागरिकांना याचा फायदा द्यावा, असे आवाहन केले होते. त्यानुसार काही राज्यांनी केंद्र सरकारची भावना लक्षात घेत कर कमी केला, पण काही राज्यांनी इंधनाचे दर कमी केलेले नाहीत. यामुळे या राज्यांमध्ये इंधनाचे दर तुलनेत जास्त आहेत. हा एक प्रकारे त्या राज्यातील लोकांवर अन्याय आहेच, मात्र शेजारच्या राज्यांचेही नुकसान करीत आहे, असे सांगताना पंतप्रधान नरेंद्र मोदींनी कर्नाटक आणि गुजरातची उदाहरणे दिली.

नागरिकांना त्रास होऊ नये यासाठी काही राज्यांनी व्हॅट कमी केला. कर्नाटक आणि गुजरात जवळच्या काही राज्यांनी साडेतीन हजार ते पाच हजार कोटी रुपये कमावले. गेल्या नोव्हेंबर महिन्यात मी सर्वांना व्हॅट कमी करण्यासाठी विनंती केली होती. मी कोणावर टीका करत नसून विनंती करीत आहे. त्या राज्यातील नागरिकांच्या भल्यासाठी सांगत आहे. तेलंगणा, आंध्र प्रदेश, तामिळनाडू, केरळ, झारखंड, महाराष्ट्र, पश्चिम बंगाल या राज्यांनी ऐकले नाही आणि त्यांच्या राज्यातील नागरिकांवरील ओझे कायम राहिले. या राज्यांनी किती महसूल कमावला हे मला सांगायचे नाही, पण आता देशहितासाठी सहा महिन्यांनी का होईना व्हॅट कमी करीत लोकांना याचा लाभ दिला पाहिजे, असा सल्ला या वेळी पंतप्रधान मोदींनी दिला. कोलकाता, हैदराबाद, चैन्नई, मुंबई, जयपूर येथे इंधनाचे दर जास्त आहेत. दीव-दमणमध्ये दर कमी आहेत. त्यामुळे इंधनाचे दर कमी करा ही विनंती आहे, असेही ते म्हणाले.

### कोरोना संकट पूर्णपणे टळलेले नाही

कोरोना संकट अद्याप पूर्णपणे टळलेले नाही. आपण इतर देशांच्या तुलनेत परिस्थिती चांगली हाताळली आहे. लसीकरणाचा यामध्ये मोठा वाटा आहे. आता काही देशांत आकडे वाढत आहेत. त्यामुळे सतर्क राहिले पाहिजे. लहान मुलांचे लसीकरण आता प्राथमिकता आहे, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वेळी सांगितले. तिसऱ्या लाटेत जास्त केसेस असतानाही व्यवहार सुरू ठेवले होते. असेच काम पुढे चालू राहिले पाहिजे. संक्रमणाला सुरुवातीलाच रोखण्यासाठी सर्वांनी एकत्रित काम केले पाहिजे, असेही पंतप्रधान मोदी म्हणाले.

### सोमय्यांसंदर्भात भाजप शिष्टमंडळाचे राज्यपालांना निवेदन

**मुंबई : प्रतिनिधी**

झेड दर्जाची सुरक्षा असूनही भाजपचे ज्येष्ठ नेते व माजी खासदार किरीट सोमय्या यांच्यावर पोलिसांच्या उपस्थितीत हल्ले होत असल्याने त्यांच्या सुरक्षा व्यवस्थेत कोणतीही ढिलाई होऊ नये यासाठी राज्य सरकारला निर्देश द्यावेत, अशी विनंती करणारे निवेदन भाजप शिष्टमंडळाने बुधवारी (दि. २७) राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांना दिले.

या शिष्टमंडळात विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर, मुंबई भाजप अध्यक्ष आमदार मंगलप्रभात लोढा, खासदार गोपाळ शेट्टी, आमदार सुनील राणे व स्वतः सोमय्या यांचा समावेश होता.

# पनवेलमध्ये रोटरी उभारणार महाराष्ट्रातील सर्वांत मोठा डेन्स ग्रीन फॉरेस्ट प्रकल्प

## महापालिकेच्या विशेष सभेत परवानगी

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्रमांक १९मध्ये हळदीपूरकर हॉस्पिटलजवळ डेन्स ग्रीन मियावाकी फॉरेस्टचा महाराष्ट्रातील सर्वांत मोठा प्रकल्प उभारण्यासाठी रोटरी क्लबला भूखंड देण्यास बुधवारी (दि. २७) झालेल्या विशेष सभेत अनुमती देण्यात आली. यामुळे हा परिसर हिरवागार तर होईलच, शिवाय या ठिकाणी मोठ्या प्रमाणात पक्षांचा रहिवास वाढून त्याचा फायदा पर्यावरणालाही होणार आहे.

पनवेल महापालिकेची विशेष सभा बुधवारी शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात महापौर डॉ. कविता चौतमोल यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या विशेष सभेस



उपमहापौर सीताताई पाटील, सभागृह नेते परेश ठाकूर, स्थायी समिती सभापती नरेश ठाकूर, महिला व बालकल्याण सभापती हर्षदा उपाध्याय, अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, उपायुक्त कैलास गावडे आदी उपस्थित होते. या वेळी विविध विषयांवर चर्चा होऊन निर्णय घेण्यात आले. (पान २ वर..)

**भूखंड क्रमांक २७३ उद्यानासाठी राखीव होता. तो रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रलला डेन्स फॉरेस्ट तयार करण्यासाठी देण्यास मंजुरी देण्यात आली. सध्याच्या काळातील महाराष्ट्रातील सर्वांत मोठा डेन्स ग्रीन मियावकी फॉरेस्टचा हा प्रोजेक्ट आहे. यामुळे पनवेलमध्ये हरित क्षेत्राचे प्रमाण वाढेल. पक्षू-पक्ष्यांचे प्रमाण वाढेल आणि या परिसराला त्याचा मोठ्या प्रमाणात फायदा होईल.**

**-परेश ठाकूर, सभागृह नेते, पनवेल महानगरपालिका**

## निवडक

### राणांचे राऊतांविरोधात थेट दिल्ली पोलिसांना पत्र

**मुंबई :** अपक्ष खासदार नवनीत राणा यांनी मंगळवारी नागपूर पोलीस आयुक्तांना पत्र लिहून शिवसेना खासदार संजय राऊत यांच्याविरोधात धक्कादायक आरोप केले होते. त्यानंतर राणा यांनी बुधवारी (दि. २७) थेट दिल्ली पोलीस आयुक्तांना पत्र लिहून राऊतांविरोधात आरोप केले आहेत. मी मागासवर्गीय समाजाची असल्याने मला जाणूनबुजून ४२० म्हणाले. त्यामुळे खासदार राऊतांविरोधात सक्त कारवाई करा, अशी मागणी खासदार राणा यांनी दिल्ली पोलिसांना लिहिलेल्या पत्रात केली आहे.

### संभाजी भिडे सायकलवरून पडले; रुग्णालयात दाखल

**सांगली :** शिवप्रतिष्ठान हिंदुस्तानचे संस्थापक संभाजी भिडे सायकलवरून पडल्याचे वृत्त आहे. या अपघातात ते जखमी झाले असून त्यांच्या खुब्याला मार लागला आहे. भिडे यांना उपचारासाठी भारती रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.



लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते

# विद्यार्थ्यांना मोफत सायकल वाटप

## कामोठे येथील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या कामोठे येथील न्यू इंग्लिश स्कूलमधील गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना नगरसेविका हेमलता गोवारी आणि जवाहर इंडस्ट्रियल इस्टेट यांच्या वतीने रवी गोवारी यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून मोफत सायकल वाटप कार्यक्रम बुधवारी (दि. २७) आयोजित करण्यात आला होता. 'रयत'चे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली आणि हस्ते हा कार्यक्रम झाला.

या कार्यक्रमाला नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत, विकास घरत, विजय चिपळेकर, भाजप शहर अध्यक्ष रवींद्र जोशी, के. के. म्हात्रे, ओबीसी मोर्चा जिल्हाध्यक्ष राजेश गायकर, न्यू इंग्लिश स्कूलचे व्हाईस चेअरमन सुधाकर पाटील, रमेश तुपे, भटके विमुक्त महिला आघाडी जिल्हाध्यक्ष विद्या तामखडे, युवा मोर्चा शहराध्यक्ष हर्षवर्धन पाटील, तेजस जाधव, रवी भगत, शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते. भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनीही येथे भेट दिली. (पान २ वर..)

# अनाथ मुलांच्या मदतीसाठी गाण्यांचा कार्यक्रम

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडून कौतुक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

येथील आपुलकी फाउंडेशनच्या वतीने भारतरत्न स्व. लता मंगेशकर, बप्पी लाहिरी, बाल सुब्रहमण्यम यांच्या गाण्यावर आधारित 'ए म्युझिकल ट्रिब्यूट' हा गायनाचा कार्यक्रम सादर झाला. अनाथ मुलांच्या मदतीसाठी या संगीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात झालेल्या या



कार्यक्रमास भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांची विशेष उपस्थिती लाभली. या वेळी त्यांनी आयोजनाबद्दल आणि अनाथ मुलांना करण्यात येणाऱ्या मदतीबद्दल फाउंडेशनचे कौतुक केले.

या कार्यक्रमास आपुलकी फाउंडेशनचे सल्लागार नगरसेवक अनिल भगत, अजय बहिरा, माजी नगरसेविका सुलोचना कल्याणकर, डॉ. सचिन जाधव, कामगार नेते अनिल जाधव, आपुलकी फाउंडेशनचे अध्यक्ष संजय जाधव, प्रवीण मोहोकर, दिनेश भास्कर, मिलिंद उरणकर, रमेश गरुडे, जितेंद्र खैरे, संजय जगताप, सचिन दुंद्रेकर आदी उपस्थित होते. (पान २ वर..)


### तामिळनाडूमध्ये रथयात्रेत दुर्घटना

११ ठार, १५ जण जखमी

**तंजावर : वृत्तसंस्था**

तामिळनाडूमधील तंजावर येथे बुधवारी (दि. २७) एका धार्मिक कार्यक्रमादरम्यान दुर्घटना घडली. ५०पेक्षा जास्त जण रथ ओढत असताना रथाच्या कळसाचा स्पर्श उघड्या वीजवाहक तारांना झाल्याने बसलेल्या विजेच्या झटक्यात २५पेक्षा जास्त होरपळून निघाले. या दुर्घटनेत सात जणांचा जागीच मृत्यू झाला, तर चार जण उपचारादरम्यान दगावले असून १५ जण जखमी झाले आहेत. जखमींवर स्थानिक रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेबद्दल दुःख व्यक्त केले असून पंतप्रधान सहाय्यता निधीमधून मृतांच्या नातेवाईकांना दोन लाख, तर जखमींना ५० हजारांची मदत देऊ केली आहे.






# दुसऱ्यांना दोष देणे नेहमीच सोपे असते

## फडणवीसांचे राज्य सरकारवर टीकास्त्र



**मुंबई : प्रतिनिधी**

दुसऱ्यांना दोष देणे हे नेहमी सोपे असते आणि वाईट कामे लपवण्यासाठी फायद्याचे असते, मात्र त्यामधून सर्वसामान्यांना फायदा होत नाही. जेव्हा भारत सरकारने मागील नोव्हेंबरमध्ये इंधनावरील एक्साइज ड्युटी कमी केली आणि त्यांनी राज्यांनाही कर कपात करण्यास सांगितले होते, मात्र महाराष्ट्रासहीत भाजपाची सत्ता नसणारी राज्ये नफा कमवण्यात व्यस्त होती, असा टोला मोदींच्या भाषणाचा व्हिडीओ शेअर करत विरोधी पक्ष नेते देवेंद्र फडणवीसांनी ट्विट करत महाराष्ट्र सरकारला टोला लगावला आहे.

कोरोना परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी सर्व राज्यांच्या मुख्यमंत्र्यासोबत बैठक घेतली. या बैठकीत पंतप्रधान मोदींनी भाजपची सत्ता नसणाऱ्या राज्यांवर इंधन दरवाढीच्या मुद्द्यावरुन निशाणा साधलाय. नोव्हेंबर महिन्यात केंद्र सरकारने कर कमी केल्यानंतर काही राज्यांनी कर कपात करुन सामान्यांना दिलासा दिला नाही, असा टोला मोदींनी थेट महाराष्ट्राचा उल्लेख करत लगावला. या टीकेनंतर आता विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी मोदींच्या आवाहनाचा उल्लेख करत ठाकरे सरकारचे इंधनावरील कर कमी करण्याकडे लक्ष वेधले आहे.

देशातील नागरिकांवर पेट्रोल डिझेलच्या दरांमुळे पडणारे ओझे कमी करण्यासाठी केंद्र सरकारने एक्साइज ड्युटी मागील नोव्हेंबरमध्ये कमी केली होती. केंद्राने विनंती केली होती की राज्यांनीही कर कमी करावा आणि त्याचा फायदा सर्वसामान्यांना होईल असे पहावं. यानंतर काही राज्यांनी भारत सरकारच्या भूमिकेनुसार कर कमी केला. मात्र काही राज्यांनी आपल्या राज्यातील लोकांना याचा काही फायदा पोहचू दिला नाही. यामुळे या राज्यांमध्ये पेट्रोल, डिझेलच्या किंमती इतर राज्यांपेक्षा अधिक आहेत. हा त्या त्या राज्यांमधील लोकांबरोबर अन्याय आहेच, पण याचा शेजारच्या राज्यांनाही तोटा होतो, असे पंतप्रधान मोदी म्हणाले. पुढे बोलताना, जे राज्य कर कमी करतात त्यांना राजस्वाचा तोटा होता. कर्नाटकने कर कपात केली नसती तर त्यांना या सहा महिन्यात पाच हजार कोटींचं राजस्व मिळालं असते. गुजरातनेही कर कमी केले नसते तर त्यांना साडेतीन चार हजार कोटींचं राजस्व अधिक मिळाले असतं. मात्र काही राज्यांनी आपल्या नागरिकांच्या भल्यासाठी राज्य सरकारकडून आकारल्या जाणाऱ्या कराची टक्केवारी कमी केली. सकारात्मक पावले उचलली. गुजरात आणि कर्नाटकच्या शेजारच्या राज्यांनी करामध्ये कपात न करता साडेतीन हजार कोटींपासून पाच साडेपाच हजार कोटींपर्यंत अतिरिक्त राजस्व कमावले, असे पंतप्रधानांनी म्हटले आहे.

नोव्हेंबर महिन्यात व्हॅट कमी करण्याबद्दल चर्चा झाली, आपण विनंती केली आहे. आपण कोणावर टीका करत नाही पण लोकांच्या भल्यासाठी प्रार्थना करतोय. त्यावेळी काही राज्यांनी ऐकले नाही. आता नागरिकांवरील कराचे ओझं कायम राहिले, असेही मोदी म्हणाले. पंतप्रधान मोदींनी सर्व राज्यांना इंधनावरील कर कमी करण्याचे आवाहन केले होते. यात महाराष्ट्राने तीन हजार ४०० कोटींहून अधिक नफा मिळविला आहे. महाराष्ट्र सरकारला आवाहन आहे की, त्यांनी या संदर्भात तातडीने निर्णय घेऊन मराठी माणसासहीत महाराष्ट्रातील सर्व जनतेला दिलासा द्यावा, असेही फडणवीस म्हणाले.

# मुरुडमध्ये भाजपतर्फे मोफत आधार कार्ड शिबीर



**मुरुड : प्रतिनिधी**

तालुक्याची ७६ हजार लोकसंख्या असूनसुद्धा आधारकार्ड देणारी केंद्र नेमकेच असल्याने असंख्य लोकांना आधार कार्डची सुविधा उपलब्ध नव्हती. यासाठी तालुका भाजपकडून तीन दिवसांच्या विशेष शिबिराचा शुभारंभ भाजपचे ज्येष्ठ नेते जनार्धन कंधारे यांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने करण्यात आला.

या वेळी तालुकाध्यक्ष महेंद्र चौलकर, शेगवाडा पाखाडी अध्यक्ष सुधीर पाटील, शहर भाजप अध्यक्ष उमेश माळी, बाळा भगत, सामाजिक कार्यकर्ते अरविंद गायकर, महेश मानकर, तालुका संघटक सरचिटणीस प्रवीण बैकर, अभिजित पानवलकर, किशोर म्हसळकर, सुनील खेऊर, डाकघरचे सहाय्यक अधीक्षक हनुमंत चिरमे, पोस्टमास्तर पंकज दांडेकर, डाकसहाय्यक फैयाज पंचुळकर आदी उपस्थित होते. शिबिराच्या पहिल्याच दिवशी उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे. पहिल्याच दिवशी व पहिल्याच टप्प्यामध्ये किमान १५० लोकांनी आधार कार्ड मधील दुरुस्त्या करून घेतल्या. या तीन दिवसीय विशेष शिबिरात नवीन आधार कार्ड काढणे, पत्ता बदलणे, नावात दुरुस्ती अथवा बद्दल करणे, फोटो अपडेट करणे, जन्मतारीख दुरुस्त करणे, फोन नंबर बदलणे, आधारकार्ड मोबाईलला लिंक करणे कामे करून देण्यात येणार आहेत. शेगवाडा येथील भाजप कार्यालयाजवळ हे शिबिर सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत सुरू असणार आहे. शिबिराच्या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची मुबलक सुविधासुद्धा करण्यात आली होती.

# केंद्र शासनाच्या अंत्योदय मोहिमेत रायगड जिल्ह्याचा समावेश

**अलिबाग : प्रतिनिधी**

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त देशभरात केंद्र शासनाच्या वतीने अंत्योदय मोहीम राबविण्यात येणार असून, या मोहिमेत केंद्र शासनाकडून रायगड जिल्ह्याची निवड करण्यात आली आहे. त्यानुसार जिल्ह्यात २८ एप्रिल ते २६ जून कालावधीत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असून याबाबत संबंधितांना योग्य त्या सूचना देण्यात आल्याची माहिती जि. प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी दिली.

अंत्योदय मोहीम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी महिला बचत गट स्थानिक स्वंयसेवी संस्था, स्वंयसेवक, स्वातंत्र्यसैनिक, युवा गट, महाविद्यालयीन विद्यार्थी, शेतकरी गट, मच्छीमार संस्था व सोसायटी यांचे सहकार्य घ्यावे तसेच तालुका आरोग्य अधिकारी, बाल विकास प्रकल्प अधिकारी, जिल्हा अग्रणी बँकेचे तालुका प्रतिनिधी, तालुका समन्वयक यांच्या समन्वयाने राबविणेत यावी. या संदर्भात जिल्हातील युवा संस्था, शिक्षण विभाग यांच्या समन्वयाने कला पथक, प्रभात फेरी, ग्रामसभा, विविध जंयती दिनी स्वातंत्र्यसैनिक व त्यांच्या कुटूंबीयांचा सत्कार इत्यादी उपक्रमांचे नियोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.


## ग्रुप ग्रामपंचायत वडघर
## ता. पनवेल, जि. रायगड

**(महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९) कलम १२९**

याद्वारे जाहीर करण्यात येते की, खालील तपशिलात नमुद केलेल्या मालमत्तांचे वडघर ग्रामपंचायतीकडील कर आकारणी नोंद वहितील नावांत बदल/विभाजन करणेबाबतचे प्रस्ताव इकडे दाखल झालेले असून त्यात खालीलप्रमाणे बदल प्रस्तावित आहेत.

**ट्रान्सफर**

| अ. क्र. | मालमत्ता घेणाऱ्याचे नाव | मालमत्ता देणाऱ्याचे नाव | मालमत्ता वर्णन | दस्तऐवजाचा अनुक्रमांक | दस्तऐवजाचा दिनांक/ कागदपत्रे दाखल दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | निलोफर रिजवान नाखवा | नासीर अहमद शेख | मिळकत क्रमांक–५४१, सदनिका १०३, पहिला मजला ३६५ चौ.फुट | पवल ४/ १३८७३–२०२१ | २२/०२ २०२२ |
| ०२ | मिनुनाथ वाळकू भोईर, सुनंदा मिनुनाथ भोईर, मयुर मिनूनाथ भोईर | अनिल जगन्नाथ भाताणकर व इतर | सदनिका क्रमांक–७४/२०५ दुसरा मजला वडघर, बौद्धवाडा रमाई नगर ३५२ चौ.फुट | पवल–१– ९१०७–२०१८ | १६/०२/ २०१८ |
| ०३ | हिदायतुल्ला खान | अनिल जगन्नाथ भाताणकर व इतर | सदनिका क्रमांक–७४/२०१ दुसरा मजला वडघर, बौद्धवाडा रमाई नगर | पवल–४– ४३–२०१६ | ०२/०१/ २०१६ |

वरील बाबत प्रकरणे परत्वे आवश्यकतेनुसार वडघर ग्रुप ग्रामपंचायत कर आकारणी रजिस्टरमध्ये करदात्यांच्या नावात बदल/ विभाजन करणेचे प्रस्ताव विचारधीन असून, याबाबत कोणत्याही व्यक्तीची काही हरकत असल्यास, सदर नोटीसीच्या प्रसिद्धीचे दिनांकापासून सात दिवसांचे आत ग्रामपंचायतीच्या कार्यालयात लेखी स्वरुपात दाखल करावी. वरीलप्रमाणे नमुद दिलेल्या मुदतीत हरकत प्राप्त झाली नाही तर वरील प्रमाणे नांवात बदल करणेत आले नंतर प्राप्त होणाऱ्या तक्रारीची दखल घेण्यात येणार नाही व प्रकरणी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ कलम १२९ नुसार कार्यवाही पुर्ण करण्यात येईल. याची कृपया नोंद घ्यावी.

दिनांक : २७/०४/२०२२

सही/– (श्री.नंदकिशोर कृष्णा भगत) ग्रामविकास अधिकारी ग्रुप ग्रामपंचायत वडघर

सही/– (श्री.मुकेश नारायण कांबळे) प्रशासक ग्रुप ग्रामपंचायत वडघर


### पान १ वरून

## पनवेलमध्ये रोटरी उभारणार महाराष्ट्रातील सर्वांत मोठा डेन्स ग्रीन फॉरेस्ट प्रकल्प

पूर्वाश्रमीच्या नगर परिषदेमार्फत सहा वाणिज्य संकुलातील ३० वर्षांच्या कालावधीसाठी भाडे तत्त्वावर देण्यात आलेले गाळे लीज करारनामा व हस्तांतर करणे या १९ एप्रिलच्या सर्वसाधारण सभेत स्थगित ठेवलेल्या विषयाला मान्यता देण्यासाठी बुधवारची विशेष सभा घेण्यात आली होती.

या वेळी सहा व्यापारी संकुलातील ३५५ व्यापारी गाळे हे विद्यमान गाळेधारकांना तत्कालीन नगर परिषद कायद्याप्रमाणे निविदा पद्धतीने व आरक्षणानुसार वाटप करण्यात आलेले असल्याची माहिती उपायुक्तांनी दिल्यावर त्याला मान्यता देण्यात आली.

पनवेल महापालिका हद्दीतील महापालिकेच्या मालकीचा शहरातील भूखंड क्रमांक २७३ हा डेन्स फॉरेस्ट तयार करण्यासाठी रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रलला देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली. यामध्ये हरित क्षेत्र विकसित करण्यासाठी महापालिका कोणताही मोबदला देणार नाही. वृक्षारोपणाच्या आराखड्यास महापालिकेची परवानगी घ्यायची असून तेथील झाडांची देखभाल ११ महिने रोटरी क्लबने विनामोबदला करायची आहे.

**अशी आहे मियावाकी पद्धत**

सामान्य वनांच्या तुलनेत मियावाकी पद्धतीने विकसित करण्यात येणाऱ्या वनांमधील झाडे ही अधिक वेगाने वाढतात. सामान्य पद्धतीने लावलेले झाड वाढण्यास जेवढा कालावधी लागतो, त्या तुलनेत साधारणपणे निम्म्यापेक्षा कमी कालावधीत तेवढ्याच उंचीचे झाड वाढते. साधारणपणे दोन वर्षांत विकसित होणाऱ्या मियावाकी पद्धतीच्या वनांमध्ये झाडांमधील अंतर हे कमी असल्याने ती घनदाट असतात. या वनांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे सुरुवातीची साधारणपणे दोन किंवा तीन वर्षे या वनांची नियमित देखभाल करावी लागते. त्यानंतर ही वने नैसर्गिकरित्या वाढत राहतात आणि अव्याहतपणे प्राणवायू देत राहतात. यामध्ये फळझाडे, फुलझाडे, औषधी गुणधर्म असणारी झाडे अशा विविध प्रकारच्या झाडांचा समावेश आहे. प्रामुख्याने चिंच, पळस, करंज, बेहडा, सावर, रतनगुंज, साग, सीताफळ, बेल, पारिजातक, कडूनिंब, बांबू, पेरू, पुत्रजीवा, सीता अशोक, हरडा, खैर, जांभूळ, मोह, बहावा, सुरु, बदाम, रिठा, शिसम, बकुळ, अर्जुन, फणस, आवळा, कदंब यासारख्या विविध प्रकारची झाडे यात असतात.

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना मोफत सायकल वाटप

रयत शिक्षण संस्था ही गोरगरीबांना हात देणारी संस्था आहे, असे प्रतिपादन लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी या वेळी केले. त्यांनी आपल्या भाषणात रवी गोवारी आणि हेमलता गोवारी यांनी केलेल्या या सामाजिक कार्याचे कौतुक केले व अशीच कामे येणाऱ्या काळातही सुरू ठेवा, असे म्हटले तसेच सर्वांनी त्यांना आदर्श घेऊन कामे करीत रहा, असा सल्ला दिला.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना लोकनेते रामशेठ ठाकूर म्हणाले की, ज्या परिस्थितीमध्ये आपण शिक्षण घेतले त्याची जाणीव ठेवणे गरजेचे आहे. आई–वडिलांच्या आठवणींबरोबरच समाजातील ज्या ज्या चांगल्या माणसांनी आपल्याला मदत केली आहे त्यांचीही आठवण आपण कायम लक्षात ठेवली पाहिजे.






## अनाथ मुलांच्या मदतीसाठी गाण्यांचा कार्यक्रम

या कार्यक्रमात प्रसिद्ध गायक गोविंद मिश्री, जया पियुष, संदीप शहा, शाकंबरी बागडे, डी. महेश यांनी आपल्या गायनाने उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमास अरुण कारेकर यांचे संगीत संयोजन लाभले.

या कार्यक्रमातून जमा झालेल्या रकमेतून बालग्राम अनाथ आश्रमाला मदत करण्यात येणार आहे, अशी माहिती फाउंडेशनचे प्रवीण मोहोकर यांनी दिली.

## ‘उन्हाळी शिबिरामध्ये विद्यार्थी, नागरिक, खेळाडूंनी सहभाग घ्यावा’

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय आणि डिफेन्स अकॅडमी अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने २८ ते ३० एप्रिल रोजी संध्याकाळी ४ ते ७ या वेळेत विविध क्रीडा उपक्रम उन्हाळी प्रशिक्षण आयोजन करण्यात आले आहे.

स्वसंरक्षण कला व आत्मनिर्भरता, क्रीडा क्षेत्रातील मार्गदर्शन, शारीरिक व मानसिक सक्षमीकरण, फिटनेस क्टिविटी, योगा, मेडिटेशन व प्राणायम, संभाषण कौशल्य व व्यक्तिमत्व विकास, करिअर मार्गदर्शन व सैन्य भरती संदर्भात मार्गदर्शन व आपत्ती व्यवस्थापनासंदर्भात जागरुकता इत्यांदी विविध उपक्रम जयमाला गार्डन, अलिबाग येथे घेतले जाणार आहेत. यात सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी रवींद्र नाईक यांनी केले आहे.


### जाहीर नोटीस

**मोटार अपघात दावा न्यायधिकरण, मुंबई**
**(महाराष्ट्र मोटर वाहन नियम, १९८९ मधील २६०(१) अन्वये नोटीस)**
**अर्ज क्रमांक : ८८५/२०२१**

**स्वप्निल किशन जाधव** — **अर्जदार**
**विरूद्ध**
**मेहता इंटरप्राइझेस** — **विरूद्ध पक्षकार**
**आणि**
**चोला एमएस जनरल इश्युरन्स कं.लि.** — **विमाकार**

**प्रति,**
**मेहता इंटरप्राइझेस**
**पत्ता-** एमएसइबी जीटीपीएस प्लॅट नं.२,
बिल्डिंग नं.३,बोकाडविरा एमएसइबी ऑफिसर्स कॉलनी,
बोकाडविरा, रायगड- ४०० ७०२.
यांस,

ज्याअर्थी सोबत जोडलेल्या अर्जानुसार आपणाविरूद्ध मोटर वाहन अधिनियम,१९८८ कलम १६५,पोट कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या स्वरूपाचा अपघाताबाबत मोटर वाहन अधिनियम १९८८, कलम १६६ आणि १४० अ नुसार भरपाई मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी, उक्त अर्जाची दिनांक **०६-०५-२०२२** रोजी **सकाळी ११.००** वाजता , माननीय **अध्यक्ष श्री. संजय किशनराव चौदंते कोर्ट क्र.(०१)** यांच्या न्यायधिकरणात सुनावणी करून सदर अर्ज निकालात काढण्याचे ठरवले आहे, याची दखल घ्यावी.

या नोटीशीद्वारे आपणांस कळविण्यात येते की, वर नमुद केलेल्या दिनांकास आपण हजर रहावे व आपणांस जो कोणताही साक्षीपुरावा सादर करण्याची इच्छा असेल तो साक्षीपुरावा सादर करावा. अर्जामध्ये केलेल्या दाव्याबाबत आपण आपले लेखी निवेदन दाखल करू शकता. या नोटीशीद्वारे आपणांस असेही कळविण्यात येते की,संदर्भाधीन अर्ज निकालात काढण्यासाठी निश्चित केलेल्या दिनांकास आपण हजर राहिला नाहीत किंवा साक्षीपुरावा सादर करू शकला नाहीत, तर सदरहू अर्जाची सुनावणी व निर्णय आपल्या अनुपस्थितीत करण्यात येईल, याची दखल घ्यावी.

ही नोटीस आज दिनांक **११-०३-२०२२** रोजी माझ्या सहीने व न्यायाधिकरणाच्या शिक्क्यानिशी देण्यात आली आहे.

कोर्टाचा शिक्का

आदेशावरून
सही/-
प्रबंधक
मोटार अपघात दावा न्यायाधिकरण,
९, हजारीमल सोमाणी मार्ग, छत्रपती शिवाजी टर्मिनससमोर,
मुंबई ४००००१



### जाहीर नोटीस

सर्व लोकांना या जाहीर नोटीशीने कळविण्यात येत आहे की सदरहु गाळा मीलकत ही श्री. राजेंद्र ह्यांनी विकत घेण्याचे ठरविले आहे.

**श्री. मेजन शेखअली चिलवान यांचे नावे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे**

**मौजे : उलवे , ता. पनवेल, जि. रायगड येथील**

| सेक्टर | लॉट नंबर | इमारतीचे नाव | गाळा नंबर |
|---|---|---|---|
| १७ | ६५ | प्रतिक अव्हेन्यु | ०४ |

मौजे उलवे येथील वर वर्णन केलेल्या गाला श्री . अब्दुल मोहम्मद खालीफ मालक असुन ती गाळा मिलकत श्री. राजेंद्र हे विकत घेणार असुन गाळा मिळकतीबाबत कोणत्याही अथवा कसल्याही हरकती असल्यास सदरच्या हरकती ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून एका महिन्याच्या आत वर नमुद केलेल्या पत्यावर दाखल कराव्यात मुदतीनंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही व श्री. राजेंद्र यांचे लाभांत खरेदीखत जाईल यांची नोंद घ्यावी.

दिनांक : २४.०४.२०२२
ठिकाण : पनवेल

**सही/–**
**अ‍ॅड. नित्यानंद राम ठाकूर**

मु. कोपर, पो. गव्हाण, ता. पनवेल, जि . रायगड.
फोन नंबर ९३२६०९०७०० / ८६५२८६३२०८






पनवेल भाजपतर्फे
**जनहितार्थ**
माहितीसाठी

**पनवेल महानगरपालिका हद्दीत**
**गुरुवार, दि. २८ एप्रिल २०२२ रोजी होणारे**

**कोरोना प्रतिबंधक लसीकरण**

**(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)**

**कोविशिल्ड कोव्हॅक्सिन कार्बेव्हॅक्स**

**सर्व केंद्रांवर (वयोगट :** १२ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी–१, गावदेवी पाडा, पनवेल
- २. आय.टी.एम. कॉलेज, नवीन पनवेल
- ३. यूपीएचसी–४, सिडको समाज मंदिर, कळंबोली
- ४. यूपीएचसी–५, डी–मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ५. यूपीएचसी–६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे
- ६. टाटा अ‍ॅडव्हान्स सेंटर, खारघर
- ७. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
- ८. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल

**Pricautionary dose हे फक्त दुसरा डोस घेऊन नऊ महिने पुर्ण झालेल्या HCW, FLW, व ६० वर्षांवरील Comorbid व्यक्तिंचेच लसीकरण केले जाईल याची नोंद घ्यावी.**

**ग्रामिण लसीकरण**

- तळोजा पाचनंद
- रोहिंजन/ किरवली
- टेंभोडे
- नावडा
- ओवेकॅम्प/ओवे
- रोडपाली बौधवाडी/ रोडपाली कातकरीवाडी

**ग्रामिण लसीकरण सत्रांत दि. १८.०४.२०२२ पासून तक्त्यात नमूद केलेल्या गावामध्ये वयोगट १२–१४ यांस कार्बेव्हॅक्स व १५ ते १८ वयोगटातील लाभार्थ्यांसाठी कोव्हीक्सिन लस उपलब्ध असणार आहे.**

**Precautionary Dose बाबत माहिती**

- शासकीय कोविड लसीकरण केंद्रांमध्ये ६० वर्ष वरील नागरीकांना, तसेच FLW, HCW यांना दुसरा डोस घेऊन ९ महिने(३९ आठवडे/२७३ दिवस) झालेल्या लाभार्थ्यांना Precautionary Dose पुर्वी प्रमाणेच उपलब्ध होणार आहे.
- दि. १०.०४.२०२२ पासून सर्व खासगी कोविड लसीकरण केंद्रांमध्ये १८–५९ वर्ष (Year of birth 1963-2004) वरील नागरीकांचे दसरा डोस घेऊन ९ महिने(३९ आठवडे/२७३ दिवस) झालेल्या नागरीकांना Precautionary Dose उपलब्ध होणार आहे.
- खासगी कोविड लसीकरण केंद्रांमध्ये लसीकरण **सशुल्क** असणार आहे.
- **१८–५९** वय नागरीकांचे Precautionary Dose हे **फक्त खाजगी कोविड लसीकरण केंद्रांमध्ये** उपलब्ध असेल.
- या लसीकरणाकरीता **कुठलेही नविन रजिस्ट्रेशन** करण्याची आवश्यकता नाही.
- **१८–५९** वय नागरीकांचे Precautionary Dose च्या लाभार्थ्यांनी दुसऱ्या डोस चे सर्टिफिकेट/ दुसरा डोस घेताना वापरलेला ID Proof व दुसऱ्या डोस करीता दिलेला मोबईल नंबर लसीकरण केंद्रावर सोबत घेऊन जावा.
- या लसीकरीताची शुल्क रु. २२५+GST + रु. १५० पर्यंत सर्विस शुल्क शासनाने ठरविले आहे.
- नागरीकांना लस घेताना पहिले दोन डोस ज्या लसीचे घेतले आहेत तीच लस Precautionary Dose साठी घ्यावी लागणार आहे.
- लाभार्थ्यांना कोविन अँप वर कोणत्या खासगी लसीकरण केंद्रांवर लसीकरण सुरु आहे हे दिसणार आहे त्याप्रमाणे कोविन वर Online Booking करुन किंवा प्रत्यक्ष लसीकरण केंद्रांवर देखील Booking करुन लस घेता येईल.

## कासाडी नदीचे बदलले रुप!



**पनवेल : नावडा फाटा परिसरातील कासाडी नदीचे रूप दिवसेंदिवस बदलत चालले आहे. कारखान्यांमधून वाहून येणारे प्रदूषित व रसायनयुक्त पाणी यामुळे नदीचा रंग बदलत चालला आहे. या प्रदूषित पाण्यामुळे नागरिकांचे आरोग्यही धोक्यात आले आहे.** (छाया : लक्ष्मण ठाकूर)

## ग्रामीण जीवनवाहिनी पूर्वपदावर

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

गेल्या कित्येक महिन्यांपासून बंद असलेली ग्रामीण भागातील जीवनवाहिनी म्हणून ओळखली जाणारी 'लालपरी' पुन्हा एकदा सुरू झाल्याने सर्वसामान्यांना सुखद दिलासा मिळाला आहे.

एस टी कर्मचाऱ्यांच्या आंदोलनाबाबत उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर कामावर परतणाऱ्या एसटी कर्मचाऱ्यांची संख्या वाढू लागली आहे. यातील बहुतेक कर्मचारी रुजू झाले आहेत. लालपरीतून खूप दिवसांनी प्रवास करायला मिळणार हा क्षणच वेगळा असल्याचे काही प्रवाशांनी सांगितले आहे. ग्रामीण भागात आज कित्येक महिन्यांनी लालपरीचे आगमन झाले आहे. अनेक महिला कर्मचारी पुन्हा ड्युटीवर जॉईन होताना भावनिक होत असल्याचे दिसून येत आहे. सोशल मीडियावर देखील या प्रकारचे व्हिडिओ व्हायरल होताना दिसत आहेत. या मुळे का होईना एस टी हा विषय सर्वसामान्यांच्या अतिशय जवळचा आणि जिव्हाळ्याचा विषय बनला आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून एसटीचे चाक आगारातच रुतले होते. मात्र आज एसटीने पुन्हा एकदा धाव घेतली असल्याचे पाहायला मिळत आहे. ग्रामीण भागात एसटी आगारातील ९९% कामगार कामावर रुजू झाले असून, लालपरिंच्या चाकांनी पुन्हा वेग धरला आहे.

दरम्यान, आता लांब पल्ल्यांच्या गाड्या देखील पूर्ण क्षमतेने सुरू करण्यात आल्या आहेत. एसटी कर्मचाऱ्यांचा संप सुरू झाल्यापासून खासगी वाहतूक करणारे चालक अव्वाच्या सव्वा पैसे घेत होते. त्यांच्या या मनमानीमुळे सर्वसामान्य माणसाला खूप त्रास सहन करावा लागत होता. या मुळे ही बससेवा पूर्ववत झाल्यामुळे ग्रामीण भागातील लोकांच्या चेहऱ्यावर समाधान दिसून येत आहे.



## उरणमध्ये पशुसंवर्धन विभागातील ३४पैकी नऊ अर्ज मंजूर

**उरण : प्रतिनिधी**

शेतीसोबत पूरक व्यवसायातून रोजगार निर्मिती व्हावी, यासाठी पशुसंवर्धन विभागाकडून विविध योजना राबविल्या जात आहेत. कुक्कुट पालन शेळी गट व दुधाळ जनावरांचा गट योजनांसाठी उरण तालुक्यातील ३४ ऑनलाइन अर्ज प्राप्त झाले, त्यापैकी तालुक्यात मंजूर नऊ लाभार्थ्यांना योजनांचा लाभ मिळणार आहे.

पशुसंवर्धन विभागामार्फत विविध योजनांसाठी राज्य स्तरावर खुल्या गटासाठी व जिल्हा परिषद स्तरावर अनुसूचित जाती जमाती साठी योजना राबविण्यात येतात या योजनांतर्गत कुक्कुट पालनगृह, शेळी मेंढी गट व दुधाळ गाय म्हैस या तीन योजनांसाठी शासनाने पशुसंवर्धन विभागाच्या ऑनलाईन पोर्टलवर अर्ज मागविण्यात आले होते. नऊ लाभार्थींना राज्यस्तरीय योजनेतून लाभ मिळणार आहे. त्यापैकी ४ दुधाळ गाय-म्हैस, ४ शेळी मेंढीपालन, १कुक्कुट पालन १ हजार पिल्ले अशा योजना आहेत. गरजू शेतकऱ्यांसाठी शासनाकडून निधी उपलब्ध करून दिला जात आहे. यासाठी शेतीपूरक व्यवसायाची निर्मिती झाली असून शेतकऱ्यांचे जीवन मान उंचावण्यासाठी मदत होणार आहे.

या योजनेंमध्ये राज्यस्तरीय कुक्कुट पालन १००० पिल्ले, ५० टक्के अनुदान, दुधाळ गाय म्हैस ५० टक्के अनुदान, शेळी-मेंढी पालन ५० टक्के अनुदान या योजनेमध्ये १ बोकड आणि १० बकऱ्या असा समावेश आहे.

विशेष तालुक्यातून संपूर्ण योजनेसाठी ३४ अर्ज ऑनलाईन प्राप्त झाले आहेत. अनुदान कमी असल्याने ९ अर्ज मंजूर झाले आहेत. अनुसूचित जातीमधून एकही अर्ज प्राप्त झालेला नाही. ही योजना पाच वर्षांसाठी असल्याने पुढील लाभार्थ्यांचा विचार करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

**शासनाने योजना पारदर्शक होण्यासाठी ऑनलाइन पद्धतीने अर्ज मागविले आहेत. पाच वर्षांसाठी ही योजना आहे. या वर्षीसाठी उरणमधून नऊ अर्ज मंजूर आहेत. ज्या अर्जदाराचे अर्ज आले आहेत, त्यांना पुढील वर्षी प्राधान्य दिले जाणार आहे.**

**-डॉ. अनिल धांडे, पशुधन अधिकारी, पं. स. उरण**

## कळंबोलीत सिडकोची कारवाई

**पनवेल : वार्ताहर**

कळंबोलीत सिडकोच्या मोकळ्या भूखंडावर गॅरेज सुरू करण्यात आले होते तसेच या ठिकाणी पार्किंगही करण्यात येत होती. यावर सिडकोच्या अतिक्रमणविरोधी विभागाने मंगळवारी (दि. २६) कारवाई केली. पोलीस बंदोबस्तात सिडको अतिक्रमणविरोधी पथकामार्फत ही मोहीम राबविण्यात आली.

येथील व्यावसायिकांना यापूर्वी सिडकोच्या अतिक्रमणविरोधी विभागाकडून नोटीस देण्यात आल्या होत्या. त्यानंतर मंगळवारी अखेर कारवाई करण्यात आली.



**पनवेल : भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी सुकापूर येथील श्लोक उदय म्हसकर याचे वाढदिवसानिमित्त अभीष्टचिंतन केले. या वेळी जि.प. सदस्य अमित जाधव, पंचायत समिती भूपेंद्र पाटील, ज्ञानेश्वर पाटील, राजेश पाटील आदी उपस्थित होते.**

## युसुफ मेहरअली सेंटरच्या हीरक महोत्सवानिमित्त शनिवारी कार्यक्रम

**पनवेल : प्रतिनिधी**




युसुफ मेहरअली सेंटरच्या हीरक महोत्सवानिमित शनिवार (दि. ३०) रोजी पनवेल तारा येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉक्टर जी. जी. पारीख यांनी पत्रकार परिषेदत दिली.

रायगड जिल्ह्यातील आदिवासी आणि वंचित घटकांच्या सर्वांगीण विकासासाठी काम करणाऱ्या युसूफ मेहरअली सेंटरच्या हीरक महोत्सव वर्षानिमित्त संस्थेची वाटचाल व उपक्रमांविषयी सविस्तर माहिती देण्यासाठी बुधवारी श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ, मार्केट यार्ड, पनवेल येथे पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी सेंटरचे संस्थापक ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक डॉ. जी जी. पारीख, अध्यक्ष उषाबेन शहा, उपाध्यक्ष हरिष शहा, सहसचिव मधु मोहिते व संतोष ठाकूर आदी उपस्थित होते.

महाराष्ट्रात युसूफ मेहरअली सेंटरने आपली मागील साठ वर्षात स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. स्वातंत्र्य चळवळीत समाजवादी नेत्यांनी महात्मा गांधीजींची भूमिका महत्त्वाची मानून ग्रामीण विकास व तिथे रोजगार संधी उपलब्ध करणे हे आपले विकास लक्ष असले पाहिजे यावर भर दिला होता. युसूफ मेहरअली हे समाजवादी विचारांसाठी कार्यरत होते. त्यांना अल्प आयुष्य लाभल्याने त्यांच्या सहकार्यांनी १९६२ मध्ये त्यांचा विचार व कार्य पुढे चालू राहण्यासाठी युसूफ मेहरअली सेंटरची स्थापना करण्यात आली. पनवेल तालुक्यात तारा येथे प्रथम आरोग्य सेवेला सुरुवात केली. रोजगाराभिमुख उपक्रम सुरू केले. आज ६० वर्षांनी त्याचा महावृक्ष झाला असून देशातील नऊ राज्यात आपली ओळख निर्माण केल्याचे डॉ. पारीख यांनी या वेळी सांगितले.

दरम्यान शनिवार ३० एप्रिल रोजी सकाळी १०.३० वाजता तारा ता. पनवेल येथे हीरक महोत्सवानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून त्याचे उद्घाटन रायगडच्या पालक मंत्री आदिती तटकरे यांचे हस्ते होणार आहे. या वेळी सामाजिक कार्यकर्त्या मेधा पाटकर, मावळचे खासदार श्रीरंग बारणे, उरणचे आमदार महेश बालदी, माजी खासदार हुसेन दलवाई, तुषार गांधी, इरफान इंजिनियर व रायगडचे जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर उपस्थित राहणार आहेत.

या कार्यक्रमाला सर्वांनी उपस्थित राहण्याचे आवाहन डॉ. पारीख यांनी या वेळी केले.





**पनवेल : महापालिकेच्या शाळा क्रमांक २ व ३मध्ये शाळापूर्व तयारी मेळाव्याला नगरसेविका दर्शना भोईर यांनी बुधवारी भेट दिली. या वेळी नगरसेविका रूचिता लोंढे, इनरव्हील क्लब अध्यक्ष सुलभा निंबालकर, शाळा व्यवस्थापन अध्यक्षा राजश्री भागने, सुजित म्हात्रे, मुख्याध्यापक वैशाली पाटील, उपमुख्याध्यापक मनीषा म्हात्रे, कमल तायडे, सुनीता बडे, तनुजा दलाल यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.**


## श्रीमती सावित्रीबाई फुले विद्यालयाला बेस्ट स्कूल पुरस्कार

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

ठाणे दिवा येथील श्रीमती सावित्रीबाई फुले विद्यालय या शाळेने कोरोना काळात सामाजिक जाणिवेतून केलेल्या कामाची दखल घेत राज्यस्तरीय बेस्ट स्कूल पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

मेस्टा अधिवेशन नुकतेच यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुख्य सभागृहात झाले. शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड, उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत, शिक्षण राज्यमंत्री बच्चू कडू, माजी मंत्री सचिन अहिर, ऑस्ट्रेलियन शिक्षण तज्ज्ञ, मेस्टाचे संस्थापक अध्यक्ष संजयराव तायडे-पाटील यांच्या हस्ते या पुरस्काराचे वितरण करण्यात आले.

शाळा गुणवत्तापूर्ण शिक्षणाबरोबर मुलांचे व्यक्तिमत्त्व घडविण्यासाठी अनेक उपक्रम राबविते. मेस्टाच्या मागण्या रीतसर असून त्या सोडविण्यासाठी आपण निश्चित सकारात्मक प्रयत्न करू आणि काही दिवसातच तुम्हाला हे दिसून येईल, असे शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांनी इंग्रजी शाळा संचालकांना आश्वस्त केले.







## उरण येथे गुरुचरित्र पारायण सप्ताहानिमित्त विविध कार्यक्रम

**उरण : वार्ताहर**

श्री स्वामी समर्थ पुण्यतिथी निमित्त उरण शहरातील आनंदनगर येथील श्री स्वामी समर्थ केंद्रात २१ ते २८ या कालावधीत श्री गुरुचरित्र पारायण सप्ताह सुरु आहे. त्या निमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

सकाळी ८ वाजता भूपाळी आरती, ८.१५ वाजता श्री स्वामी समर्थ अभिषेख, सकाळी ८.३० ते १०.३० पर्यंत श्री गुरुचरित्र ग्रंथाचे वाचन, रोज सायंकाळी ४नंतर श्री स्वामी सारामृत, ग्रंथपाठ, श्री दुर्गा सप्तशती, ग्रंथांचे पाठ, श्री मल्हारी, ग्रंथांचे पाठ, श्री नवनाथ भक्तीसार, गीताई, मनाचे श्लोक, सायंकाळी ६.३०नंतर होमहवन आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. श्री स्वामी समर्थ पुण्यतिथी गुरुवारी (दि. २८) असल्याने सकाळी महाअभिषेक श्री स्वामी सारामृत ग्रंथांचे वाचन, सकाळी १०.३० वाजता आरती मंत्र श्लोक, दुपारी १२ नंतर महाप्रसाद, सायंकाळी ६.३० वाजता आरती व सांगता समारोप. दर गुरुवारी उरण येथील आनंदनगर येथील केंद्रात सकाळी ८ वाजता, दुपारी १०.३० वाजता व सायंकाळी ६.३० वाजता आरती केली जाते.



## राम प्रहर अर्थसाक्षर स्पर्धा : १८

**अर्थसाक्षर स्पर्धेचे तीन प्रश्न खाली दिले आहेत.**

**वाचक स्पर्धकांनी निवडलेली बरोबर उत्तरे पुढील पाच दिवसांत म्हणजेच गुरुवारी रात्री ८ वाजेपर्यंत 'राम प्रहर'च्या ७७३८१०६००९ या मोबाईल क्रमांकावर कळवावी (व्हॉट्सअॅप, मेसेज अथवा malharnetwork2022@gmail.com यावर मेल केले तरी चालेल).**

**१. आपण कर्जदार असाल तर कोणते कर्ज आधी फेडणे फायद्याचे आहे?**

***अ.*** गृह कर्ज — ***आ.*** कारवरील कर्ज
***इ.*** क्रेडीट कार्डवर घेतलेले कर्ज — ***ई.*** इन्शुरन्स पॉलिसीवर घेतलेले कर्ज

**२. शेअर बाजाराच्या गुंतवणुकीचा लाभ घेण्यासाठीचा सर्वात सुरक्षित मार्ग कोणता?**

***अ.*** डे ट्रेडिंग — ***आ.*** पोझिशनल ट्रेडिंग
***इ.*** फ्युचर अँड ऑप्शन — ***ई.*** म्युच्युअल फंड

**३. उत्पन्न सुरु झाल्यावर सर्वात आधी कोणती गुंतवणूक केली पाहिजे?**

***अ.*** आरोग्य विमा — ***आ.*** घर खरेदी
***इ.*** एलआयसी पॉलिसी — ***ई.*** शेअर बाजार

Save More - Get Pure
E-store India
India's Widest SWADESHI Supermarket
India's Next Retail Revolution
BEST PRICE SUPERMARKET
ASSURED MINIMUM 4% OFF ON ALL PRODUCTS
UPTO 33% OFF
Sai Sarang Co-op Society, Shop No.1&2, Momin Pada, Tapal Naka,Old Panvel, Pin - 410 206.

**टीप : वरील तीनही प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या वाचकांमधून पहिल्या तीन क्रमांकांची निवड संगणक प्रणालीने करण्यात येईल. या तीनही विजयी वाचकांना पनवेल, टपाल नाका येथील 'ई-स्टोर इंडिया'तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येतील, तसेच सर्व विजयी वाचक स्पर्धकांची नावे पुढील रविवारी अर्थ प्रहर सदरात जाहीर करण्यात येतील.**

**...तर मग चला लागा तयारीला आणि अर्थसाक्षर स्पर्धेत यशस्वी व्हा!**

## संपादकीय

# केंद्राच्या नावानं...

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बुधवारी प्रथमच इंधन दरवाढीवरून काही राज्यांच्या सरकारांना थेट खडे बोल सुनावले. देशाची अर्थव्यवस्था मजबूत करण्यासाठी केंद्र आणि राज्यांमध्ये सामंजस्य आवश्यक असल्याचे त्यांनी या वेळी नमूद केले. जनतेच्या कळकळीपोटी पंतप्रधानांनी केलेल्या या आवाहनाला महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी मात्र आधी केंद्राने जीएसटीची थकबाकी द्यावी असे प्रत्युत्तर दिले!

**समस्या कुठलीही असो ती सोडवण्याचे आपले कामच नाही असा महाविकास आघाडी सरकारचा ठाम निर्धारच दिसतो. महाराष्ट्रावर गेल्या ३० महिन्यांत जी संकटांवर संकटे चालून येत आहेत. त्यातील निम्म्याहून अधिक समस्या प्रशासकीय सुस्ती आणि राज्यकर्त्यांचा नाकर्तेपणा यामुळे निर्माण झालेल्या आहेत. उरलेल्या समस्यांची गणना नैसर्गिक आपत्तींमध्ये करता येईल. दुर्दैवाने महाराष्ट्रात सरकार नावाची चीजवस्तू अस्तित्वातच नाही अशी स्थिती आहे. समस्या सोडवण्याची वेळ आली की खुशाल केंद्र सरकारकडे बोट दाखवावे आणि बाकीचा वेळ भ्रष्टाचारात आणि कुरघोडीच्या राजकारणात मश्गुल होऊन जावे असा आघाडी सरकारचा खाक्या आहे. याला कुठल्या तोंडाने सरकार म्हणायचे, असा सवाल आता जनताच विचारू लागली आहे. आजवर अनेक महत्त्वाचे निर्णय केंद्र सरकारवर लोटून महाविकास आघाडी सरकार मोकळे झाले आहे. इंधन दरवाढ हादेखील असाच एक निर्णय. गेल्या काही महिन्यांपासून इंधनाचे दर दिवसेंदिवस वाढत असून पेट्रोल-डिझेलने तर घबराटच उडवली आहे. गेल्या तीन महिन्यांत पेट्रोल-डिझेल आदी इंधनांचे दर वाढत वाढत १२० रुपयांच्या आसपास पोहचले आहेत. इंधनाचे दर वाढले की वाहतुकीचा खर्च वाढतो. स्वाभाविकच बाजारपेठेतील अन्य मालांच्या किमतीही वाढतात. अर्थव्यवस्थेतील हे दुष्टचक्र भेदणे वाटते तितके सोपे नाही. इंधनाच्या बाबतीत परावलंबी असलेल्या भारतासारख्या देशात तर ते कर्मकठीणच म्हणावे लागेल. इंधनाचे दर आटोक्यात राहून महागाईला लगाम बसावा यासाठी केंद्र सरकारने काही महिन्यांपूर्वी इंधनांवरील कर कमी केले. इंधनावर केंद्र सरकार कर घेते त्याचप्रमाणे राज्य सरकारेदेखील कर वसूल करत असतात. राज्य सरकारांनीदेखील इंधनावरील मूल्यवर्धित कर कमी केला तर जनतेला त्याचा लाभच होईल. केंद्र सरकारने इंधनावरील कर कमी केल्यानंतर आपापल्या राज्यातील जनतेचे हित पाहून भाजपप्रणित सरकारे असलेल्या राज्यांनी मूल्यवर्धित कर (व्हॅट) कमी केला. परिणामी गुजरात, कर्नाटक, मध्य प्रदेश आदी राज्यांमध्ये इंधनांचे दर महाराष्ट्रापेक्षा १०-१२ रुपयांनी कमीच आहेत, तर पश्चिम बंगाल आणि महाराष्ट्रासह बिगरभाजप सरकारे असलेल्या राज्यांनी मात्र इंधनावरील मूल्यवर्धित कर अजिबात हटवला नाही. केंद्र सरकारशी वाकड्यात शिरण्याच्या नादात त्यांनी आपल्या राज्यातील जनतेची परवड चालू ठेवणे पसंत केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बुधवारी काही राज्यांच्या मुख्यमंत्र्यांशी ऑनलाइन बैठक घेऊन कोरोनाबाबत परिस्थितीचा आढावा घेतला. त्या बैठकीत बोलताना पंतप्रधानांनी बिगरभाजप राज्यांनी इंधनावरील मूल्यवर्धित कर कमी केल्यास राज्यातील जनतेला लाभ मिळेलच, परंतु तो शेजारच्या राज्यालादेखील उपकारक ठरेल, असे आवाहन केले. पंतप्रधानांचे आवाहन हे देशातील जनतेच्या काळजीपोटीच होते. त्यावर राजकारण पेटवणे उचित नव्हते. तरीदेखील महाराष्ट्राचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी पंतप्रधानांच्या आवाहनाला राजकीय वळण देत आधी केंद्राने जीएसटीची थकबाकी द्यावी अशी उथळ मागणी केली. हा असा उथळपणा टाळायचा असेल, तर अर्थशास्त्र कशाशी खातात हे राज्यकर्त्यांना थोडेतरी कळावे लागते.**

# विंचूदंशावरील प्रतीलस उपयुक्त संशोधन



## खबरबात
**शैलेश पालकर**

विंचूदंश प्रतीलसीचे संशोधनाचे श्रेय हाफकीन इन्स्टिट्यूट आणि हाफकीनच्या संशोधकांचे आहे. हे संशोधन संपूर्ण मानजातीसाठी उपयुक्त असल्याचे डॉ. हिम्मतराव बावस्कर यांनी म्हटले आहे. डॉ. बावस्कर यांनी विंचूदंशावरील प्रतिलस संशोधनाव्यतिरिक्त फॉरॉन्सिक्युया डायग्नोस केला आहे.

१९७६ साली महाड कोकणात आल्यानंतर विंचूदंश रुग्णांवर उपचार सुरू केले, मात्र मृत्यूचे प्रमाण ३० टक्के एवढे चिंताजनक होते. त्यामुळे संशोधन करण्याची गरज भासली. विविध उपचार प्रयोग करून विंचूदंश झालेले रुग्ण वाचविण्याचा प्रयत्न केला. कोणतीही उपचारपद्धती व साधनसामुग्री निदान आणि वैद्यकीय साहाय्यासाठी उपलब्ध नसताना प्रयत्न सुरू होते. अशातच १९८७ साली 'प्रादूशिनी' नावाचे औषध उपलब्ध झाले. त्याचा वापर करणारा मी जगातील पहिलाच डॉक्टर होतो. याचा मी त्या वेळी लॅन्सेंट वैद्यकीय नियतकालीकामध्ये उल्लेख केला होता. तेव्हा कोणतीही लस अथवा प्रतिलस अस्तित्वात नव्हती. प्रादुशिनीचा वापर करून विंचूदंश रुग्णांच्या दगावण्याचे प्रमाण ३० टक्क्यांवरून चार टक्क्यांपर्यंत आणले. यासाठी अनेक डॉक्टर सहकाऱ्यांना प्रशिक्षित केले. त्यामुळे अनेकांचे जीव वाचविण्यात आम्हाला यश आले.

मृत्यूचे प्रमाण कमी झाल्याने डॉक्टर मंडळीही खुश होती. यासाठीच मी प्रतिलस अथवा लस शोधण्यासाठी विरोध करीत होतो. आता प्रादुशिनी हे औषध उपलब्ध असून योग्य उपाय करीत होते. लस तयार करायची झाल्यास विंचू शोधून आणावे, विष संकलित करायचे, घोडा आणि खेचरांवर विषाची मात्रा देऊन त्यांच्या रक्ताचे नमूने संकलित लस किंवा प्रतिलशीची निर्मिती करायची यासाठी लॅबोरेटरी आणि सायन्टीस्टपासून मोठ्या प्रमाणात आर्थिक तसेच मनुष्यबळ उभे करावे लागल्यास प्रभावी प्रादुशिनी हे औषध उपलब्ध असताना तयार होणारी लस अथवा प्रतिलस खर्चिक होऊन विंचूदंश रूग्णास परवडणारी नसेल या हेतूने मी सुरुवातीला विरोध केला असल्याचे त्यांनी मान्य केले.

जेव्हा १९९७मध्ये प्रतिलस आणली तेव्हा डॉ. विवेक नातू आणि सहकाऱ्यांनी व्ही. एस. मेडिकल कॉलेजमध्ये ट्रायल सुरू केली आणि प्रतिलस उपलब्ध झाल्याचे जाहीर केले. हे त्यांचेच यश आहे. २०११मध्ये संशोधनादरम्यान मी विंचूदंश रूग्णांना प्रादुशिनीसोबतच या प्रतिलशीचाही वापर केला असता निरिक्षणांती रुग्ण वेगाने बरे होण्यास प्रतिलस उपयुक्त असल्याचे आढळून आले.

विज्ञानामध्ये परिवर्तनशीलता असते. नवनवीन शोध लागत असतात. पूर्वीची मते बदलत असतात नवीन मते काही काळ रूढ राहून कालांतराने तीदेखील बदलतात ही प्रक्रिया सुरू असते. प्रादुशिनी आणि प्रतिलशीच्या एकाचवेळी सोबत वापराने मृत्यूदर झपाट्याने कमी झाल्याने २०१० मध्ये डॉ. विवेक नातू यांनी जे आर्टिकल लिहिले त्याचा संदर्भ देऊन मी प्रादुशिनी व प्रतिलस यांचा सोबत वापर करून केलेल्या उपचाराबाबतच्या माझ्या विषयामध्ये डॉ. नातू यांना प्रतिलससंदर्भात स्पष्टपणे क्रेडीट दिले आहे, असेही डॉ. हिम्मतराव बावस्कर यांनी सांगितले आहे.

पद्मश्री पुरस्कार कमिटी देत असते. त्यासाठी वैद्यकीय जीवनातील विविध योगदानाचा विचार केला जात असतो. केवळ विंचूदंश उपचार पद्धतीसाठी पद्मश्री पुरस्कार नसून डॉ. हिम्मतराव बावस्करांनी आयुष्यभर केलेल्या संशोधनाद्वारे मानवसेवा केल्यासाठी आहे. यामध्ये विंचूदंशापाठोपाठ सर्पदंशदेखील ३० टक्क्यांवरून चार टक्क्यांपर्यंत खाली आणला आहे. याखेरिज फॉरॉन्सिक्युया डायग्नोस केला आहे. विदर्भातील अमरावती, अकोला आणि बुलडाणा या तीन जिल्ह्यांतील तरुण शेतकऱ्यांमध्ये होणाऱ्या किडनी फेल्युअरवर संशोधन करून सूचविलेल्या उपायांमुळे सरकारला तेथे भूजल देण्याऐवजी जमिनीवरील जलस्त्रोत निर्माण करून त्यांचे शुद्धीकरण करावे लागले. सुमारे ६० तरुण शेतकऱ्यांना तसेच माती, पाणी व दगडांचाही अभ्यास करून कॅडमियम आणि लेड यांचे प्रमाण अधिक असल्याने शरीरामध्ये या पाण्याद्वारे किडनी हा अवयव निकामी होत असल्याचे त्यांनी सांगितले. या संदर्भात अमेरिकेमध्ये संशोधनपर लेख प्रसिद्ध झाल्याने शासनाला याची दखल घ्यावी लागली.

अल्झायमर्ससारखा स्मृतीभ्रंश सदृश्य आजार समजून येण्यासाठी न्यूरोसर्जनकडे जाण्याआधीच रूग्ण उपचार करण्यापलीकडील अवस्थेत पोहोचला असतो. याबाबतदेखील डॉ. हिम्मतराव बावस्कर संशोधन करून उपाययोजना सूचविल्या. थॉयरॉईडबाबत संशोधन करून आयोडीन मीठामुळे हा आजार बळावत असल्याचेही डॉ. बावसकर यांनी सिद्ध केले आहे. बी-१२बाबत केलेल्या संशोधनामध्ये पूर्ण शिजविलेल्या भाज्या आणि मांसाहारामधून बी-१२ नष्ट होत असून गोळयांद्वारे बी-१२ दिल्यास ते पुरेसे नसते. इन्टेस्टाईनमध्ये बी-१२ची निर्मिती होत असून आदिवासी लोकं कच्च्या भाज्या, कंदमुळे तसेच भाजून कमी शिजलेल्या खेकडे व मासळीचा आहार करीत असल्याने बी-१२ मुबलक प्रमाणात शरीरात निर्माण होत असते. नागरी जीवनात माणसांच्या शरीरामध्ये बी-१२च्या निर्मितीसाठी आम्ही दही खाण्याचे प्रमाण वाढविण्याचा सल्ला देत असतो हा शोध आम्ही लावला आहे, असेही डॉ. हिम्मतराव बावसकर यांनी स्पष्ट केले आहे.

ज्या माणसांच्या कानावर पट्टी आली अशांना हार्ट डिसीज लवकर होत असल्याचे संशोधन करून त्यास लवकरात लवकर उपचार करण्याची संधी मिळू शकते. जगातील एकूण ३४७ पब्लिकेशनपैकी १०८ पब्लिकेशन गुगलवर डॉ. हिम्मतराव बावस्कर नावावर ऑथोराईज आहेत.

मण्यार नावाचा साप रात्री घरात दबा धरून बसतो. त्याचे दात लहान असतात व तो चाटून जातो असे म्हणतात. त्याच्या दंशावर उपचार करण्यासाठी तो साप चावल्याचे निदान करण्याची आवश्यकता असते; अन्यथा अन्य आजारांची लक्षणे रुग्णांमध्ये दिसतात. या संदर्भात आपण असंख्य डॉक्टरांना प्रशिक्षित केले असल्याने रुग्णांच्या भागातच तातडीने वैद्यकीय उपचार करणारी डॉक्टर मंडळी उपलब्ध झाली आहेत, अशी माहिती डॉ. हिम्मतराव बावसकर यांनी दिली.





## बदलते तंत्रज्ञान

### स्मार्टफोन वापरताना अशी घ्या काळजी

सध्या प्रत्येकाच्या हातात स्मार्टफोन पाहायला मिळतो. फोनच्या माध्यमातून अनेक कामे सहज शक्य असल्याने या डिव्हाइसचे महत्त्व वाढले आहे. स्मार्टफोन वापरताना कोणकोणती काळजी घ्यायला हवी, त्याविषयी सविस्तर जाणून घेऊया.

स्मार्टफोनच्या माध्यमातून आपण दिवसभर अनेकांशी बोलत असतो. मित्र-मैत्रिणी, नातेवाईक याशिवाय सोशल मीडियावर ओळख झालेल्या लोकांशीदेखील आपण बोलत असतो, मात्र लक्षात ठेवा की कोणालाही आपत्तीजनक मेसेज अथवा कॉल करू नये. ते पाठवणे महागात पडू शकते. एखाद्या यूजर्सला तुमचा मेसेज न आवडल्यास तुमच्याविरोधात पोलिसात तक्रार दाखल केली जाऊ शकते व तुमच्यावर कारवाईदेखील होईल.

प्रत्येकाच्या स्मार्टफोनमध्ये महत्त्वाची माहिती स्टोर केलेली असते. यामध्ये खासगी फोटो, व्हिडिओ, महत्त्वाच्या फाईल्स तसेच बँक अकाउंटशी संबंधित माहिती असते. फोनमध्ये अनेक डिजिटल वॉलेटदेखील असतात. त्यामुळे कोणत्याही अनोळखी व्यक्तीला तुमचा मोबाइल देऊ नका. एखादी व्यक्ती तुमच्या मोबाइलचा वापर करून चुकीचा कॉल अथवा मेसेज पाठवू शकते व यामुळे तुम्हाला समस्येचा सामना करावा लागू शकतो.

सध्याचा काळ सोशल मीडियाचा आहे. त्यामुळे लोक एकमेकांना ऑफर्सचे मेसेज पाठवत असतात. अनेकदा धोकादायक लिंकदेखील शेअर केल्या जातात. त्यामुळे कोणत्याही अनोळखी लिंकवर क्लिक करणे टाळा तसेच ऑफर्सच्या नादात तुमचे मोठे नुकसान होऊ शकते. एका मेसेजमुळे तुमच्या मोबाइलमधील डेटा चोरीला जावू शकतो तसेच अनोळखी लिंकवर क्लिक करून खासगी माहिती दिल्यास बँक खातेदेखील मिनिटात रिकामे होईल. त्यामुळे अशा मेसेजपासून सावध राहा.

अनेकजण विनाकारण पोलिसांना कॉल करत असतात. यामुळे पोलिसांचा वेळदेखील वाया जातो. पोलिसांना विनाकारण कॉल केल्यास तुमच्यावर कारवाई केली जाऊ शकते. अनेकदा आपण मित्र-मैत्रिणींसोबत असताना प्रँक करण्याच्या नादात अशा चुका करतो.

स्मार्टफोनमध्ये सध्या प्रत्येक कामासाठी वेगवेगळे ॲप्स उपलब्ध असतात. मात्र, गुगल प्ले स्टोर आणि ॲपल ॲप स्टोरशिवाय इतर कोणत्याही थर्ड पार्टी प्लॅटफॉर्मवरून ॲप डाउनलोड करू नये. बनावट ॲपमुळे तुमच्या फोनमध्ये व्हायरसचा शिरकाव होऊ शकतो व तुमच्या डिव्हाइसमधील खासगी डेटा देखील चोरी होईल. या माहितीचा वापर करून सायबर गुन्हेगार तुमचे बँक खाते रिकामे करू शकतात. त्यामुळे अनोळखी लिंक अथवा थर्ड पार्टी प्लॅटफॉर्मचा वापर करून कोणतेही ॲप डाउनलोड करू नये.

# सुख म्हणजे नक्की काय असतं?



या जगात सर्वांत सुखी कोण असू शकतं? असं म्हटलं जातं की, स्वामी तिन्ही जगाचा अन् आईविना भिकारी! आईचं नातं इतकं मोठं आहे की, आपल्याला जगातील सर्व संपत्ती मिळाली, आपल्याला सर्व सुख असलं तरीपण जर आपल्याला आई नसेल, तर आपण जीवन शुष्क बनतं.

सुख जर पैशांनी विकत घेता आलं असतं, तर लोकांनी नात्यासाठी वेळ खर्च केलाच नसता. पैसा ही अशी गोष्ट आहे की तो मिळवण्यासाठी आपण आपलं आयुष्य खर्ची घालतो, परंतु पैसे कमावूनसुद्धा काही लोकांना समाधान मिळत नाही. पैसे मिळाले म्हणजे आपण जीवनातील सुख, समाधान विकत घेऊ शकतो अशा प्रकारचा गैरसमज लोकांमध्ये असतो. पैशांनी आपण सुख मुळीच विकत घेऊ शकत नाही आणि आपले दुःख पण विकूदेखील शकत नाही. काही लोक काही ना काही कारणांनी नेहमी दुःखी असतात आणि विचार करतात की, माझ्याजवळ खूप पैसे असते, तर मी सर्व गोष्टींनी सुखी झालो असतो. ही माणसे जीवनात येणाऱ्या आनंदाचा आस्वाद न घेता केळ पैसे नाही म्हणून नेहमी दुःखी होत असतात. खिशात पैसा म्हणजे जीवनाला आधार असतो असे या लोकांना वाटते.

एक प्रसिद्ध म्हण आहे की, पैशाने गादी विकत घेता येईल, पण झोप नाही. तशाच प्रकारे चांगले जीवन जगण्यासाठी पैसा खूप मोलाचे आहे हे सर्वांना माहिती आहे, पैशाचा त्यागही करून चालत नाही, पण कित्येक लोक असे आहेत की, त्यांच्याजवळ भरपूर पैसे आहेत तरीही ते कधीच सुखी होऊ शकत नाही. याचं कारण पैसा तर भरपूर आहे, पण तो योग्य ठिकाणी, योग्य कारणांसाठी जर खर्च केला नाही, तर त्या पैशाची किंमत राहत नाही. काहींना वाटते की, आता आपल्याकडे भरपूर पैसे आहेत, तर आपल्याला कुणाचीही गरज नाही. असे समजून ते जीवन जगत असतात. पैसे जवळ आले की काही माणसे जवळच्या माणसांनाही विसरतात. गरजूंना मदत करायला विसरतात. त्यामुळे या लोकांविषयी इतरांच्या मनात द्वेष निर्माण होतो. पैसे असूनदेखील हे श्रीमंत लोक सुखी आणि समाधानी होताना दिसत नाही.

माणसाने हे समजायला पाहिजे की समाधान आणि संतोष हे इतरांसाठी काही केल्याने मिळत असते. आपण कुणाच्या अडचणीच्या वेळी एखाद्याला मदत केल्यास नक्कीच आपल्या मनाला समाधान मिळते. आपण हे लक्षात ठेवलं पाहिजे की, आपला परिवार आणि आपली नाती ही जीवनात आनंद देत असतात. आपल्या आयुष्यात सुख देतात. जो आनंद माणसं देऊ शकतात तो कुणीही देऊ शकत नाही. म्हणूनच नात्यासाठी थोडासा पैसा खर्च करा. वेळ द्या, ज्यामुळे आपल्या मनाला वेगळाच आनंद अनुभवायला मिळेल आणि आपलं मन सुखी होईल.

आयुष्यभर नुसता पैसा कमावण्याकडे लक्ष देऊ नका. त्याने जगणे बाजूला राहून जाते. जन्माला येताना तुम्ही काय घेऊन आलात, आणि मरताना तुम्ही काय घेऊन जाणार? सगळे इथच सोडून जायचं आहे!!

**-प्रिती व्ही. खोब्रागडे, गुरढा, लाखनी, जि. भंडारा**



**क्लिक...क्लिक...!**

**मुरूड : पैशांअभावी गरीब मुलांना महागडी खेळणी विकत घेता येत नाही. असे असले तरी ग्रामीण भागातील ही मुले उपलब्ध सामग्रीतून कलात्मक खेळणी तयार करून तेवढाच आनंद लूटतात. या मुलांची नितीन शेडगे यांनी टिपलेली बोलकी छबी.**

## आरोग्य प्रहर



# काही पदार्थांमुळे मिळते मेंदूला चालना

तंदुरुस्त शरीरासाठी मेंदूही तंदुरुस्त असणे खूप महत्त्वाचे आहे, कारण तुमचा मेंदूच तुमच्या शरीराला कोणतेही काम करण्याची आज्ञा देते. जर तुम्ही तुमचा मेंदू निरोगी ठेवला तर तुमचे शरीरही तंदुरुस्त राहते. खाण्या-पिण्याचा तुमच्या मेंदूवर सर्वांत जास्त परिणाम होतो. जर तुम्ही पोषक तत्त्वांनी परिपूर्ण आहार घेतला नाही, तर तुमचा मेंदू कमकुवत होईल आणि तुम्ही चांगला आहार घेतला, तर तो अधिक उत्तम पद्धतीने कार्य करेल. चला तर मग जाणून घेऊया असे कोणते पदार्थ आहेत ज्यांचा आहारात समावेश करणे आवश्यक आहे.

**सकाळी कॉफी पिऊ शकता :** तुम्ही तुमच्या सकाळच्या नाश्त्यामध्ये कॉफीचा समावेश करू शकता. त्यात भरपूर कॅफीन आणि अँटिऑक्सिडंट असतात, जे मेंदूचे आरोग्य सुधारू शकतात. एवढेच नाही तर यामुळे मेंदूची सतर्कता वाढते, तुम्ही अधिक चांगल्या प्रकारे लक्ष केंद्रित करू शकता.

**आहारात हळदीचा समावेश करा :** हळदीबद्दल सर्वांनाच माहिती आहे. हे केवळ आजार कमी करण्यासाठीच उपयुक्त नाही, तर मेंदूलाही तीक्ष्ण बनवते. हे मेंदूच्या पेशी सुधारण्यासाठीदेखील उपयुक्त आहे. यासोबतच हळदीच्या सेवनाने स्मरणशक्तीही सुधारते.

**दररोज अंडी खा :** अंड्यांमध्ये प्रथिने भरपूर असतात. यामध्ये जीवनसत्त्वे बी-६ आणि बी-१२देखील असतात. नाश्त्यात अंडी खाणे तुमच्या संपूर्ण शरीराच्या आरोग्यासाठी चांगले असते. मेंदूला चालना देण्यासाठी अंडी खूप फायदेशीर आहे.

**संत्रीही फायदेशीर :** तुम्ही तुमच्या आहारात संत्र्याचाही समावेश करू शकता. तुम्ही दररोज एक संत्री खाऊ शकता. संत्र्यामध्ये व्हिटॅमिन सी मुबलक प्रमाणात आढळते. व्हिटॅमिन सी हे असे पोषक तत्व आहे जे मेंदूच्या पेशींना नुकसान करणारे मुक्त रॅडिकल्स दूर ठेवते.

**अक्रोड आणि बदाम :** यासोबतच अक्रोड आणि बदाम मेंदूची शक्ती वाढवतात. ते मेंदूला हानी पोहोचवणाऱ्या पेशींशी लढा देतात, मेंदूच्या आरोग्याला चालना देतात. तसेच तुम्ही तुमच्या आहारात ब्रोकोलीचा समावेश करू शकता. यामुळेही तुमचा मेंदू तीक्ष्ण होईल.

# नेरळसाठी २८.६४ कोटींची नळपाणी योजना मंजूर

**कर्जत : बातमीदार**

रायगड जिल्ह्यातील मोठ्या लोकवस्तीच्या नेरळ ग्रामपंचायतमधील नळपाणी योजना जुनी झाली होती. यामुळे पिण्याच्या पाण्याची गैरसोय होत होती. याबाबत शासनाकडे पाठपुरावा सुरु होता. दरम्यान, शासनाने नेरळ प्रादेशिक नळपाणी योजनेला मंजुरी दिली आहे. यासाठी २८ कोटी ६४ लाखांची तरतूद करण्यात आली आहे.

नेरळ आणि ममदापुर ग्रामपंचायतीची नळपाणी योजना १९९८मध्ये तयार झाली होती. त्यावेळी तत्कालीन आमदार यांनी पुढाकार घेऊन नेरळ प्रादेशिक नळपाणी योजना मंजूर करून आणली होती. १९९९मध्ये या नळपाणी योजनेचे लोकार्पण झाले होते. साडेसात कोटींची नळपाणी योजना, वाढती लोकसंख्या आणि नेरळमधील वाढते नागरीकरण लक्षात



घेता नवीन मोठी नळपाणी योजना तयार करावी अशी मागणी नेरळ ग्रामपंचायतीकडून करण्यात आली होती. या नळपाणी योजनेचे पाणी नेरळ तसेच ममदापुर ग्रामपंचायत आणि कोल्हारे ग्रामपंचायतमधील काही भागाला दिले जात आहे. २०१७ पर्यंत मुदत असलेल्या नेरळ नळपाणी योजनेची मुदत संपताना नवीन योजना कार्यान्वित होणे आवश्यक होते. मात्र २०२२ साल उजाडले तरी नेरळ नळपाणी योजनेची मंजुरी मंत्रालयात अडकली. नवीन नळपाणी योजना मंजूर होण्याची शक्यता नाही आणि स्थानिक कमी दाबाने होणाऱ्या पाण्यामुळे नागरिक त्रस्त आहेत.

नेरळ ग्रामपंचायतीची मागणी आणि नेरळकरांचा सततचा पाठपुरावा लक्षात घेऊन शासनाकडून पूर्ण होण्यासाठी प्रयत्न सुरु होते. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे ठाणे विभागीय मुख्य अभियंता यांनी तांत्रिक मान्यता दिल्यानंतर पाणीपुरवठा विभागाचे सदस्य सचिव यांनी ५ एप्रिल रोजी नेरळ प्रादेशिक नळपाणी योजनेला मंजुरी दिली आहे.

**वाढत्या लोकसंख्येमुळे नळपाणी योजना गरजेची!**

नेरळ गावाची सध्याची लोकसंख्या २५ हजारांच्या घरात गेली आहे. वाढते नागरीकरण आणि शहरीकरण लक्षात घेता नवीन नळपाणी योजना नेरळसाठी गरजेची होती. नळपाणी योजना मंजूर झाल्याबद्दल नागरिकांकडून आभार मानणयात येत आहेत.

# कर्जतमध्ये दोन दिवस भीम महोत्सव

**कर्जत : बातमीदार**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३१व्या जयंतीनिमित्त कर्जत तालुक्यातील बहुजन बांधव यांच्या माध्यमातून २९, ३० एप्रिल रोजी कर्जतच्या पोलीस परेड मैदानावर भीम महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

कोरोना काळात दोन वर्षे भीम महोत्सव आयोजित करण्यात आले नव्हते. त्यामुळे या वर्षी बहुजन समाजात भीम महोत्सवाबाबत उत्सुकता आहे.



कर्जत तालुका भीम महोत्सव समितीच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३१ वा जयंती उत्सव साजरा होत आहे. महोत्सवाचे हे पाचवे वर्षे असून मागील दोन वर्षे कोरोनामुळे भीम महोत्सव आयोजित करण्यात आला नव्हता. त्यापूर्वीच्या भीम महोत्सवात विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. यावर्षी २९ एप्रिल रोजी कर्जत येथील पोलीस मैदानात आयोजित भीम महोत्सवात रात्री शिंदेशाही हा भीम गीतांचा कार्यक्रम आघाडीचे गायक मिलिंद शिंदे सादर करणार आहेत. यावेळी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. ३० एप्रिल रोजी कर्जत तालुका समितीच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती सोहळ्यानिमित्त भव्य मिरवणूक कर्जत शहरात काढण्यात येणार आहे. नियोजन बहुजन समाज समिती करीत आहे.

## महाड हिरवळ महाविद्यालयात दीक्षांत सोहळा

**माणगाव : वार्ताहर**

शैक्षणिक क्षेत्रात रायगड जिल्ह्यातील अगगण्य संस्थांपैकी एक ओळखल्या जाणाऱ्या हिरवळ एज्युकेशन ट्रस्ट कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स अँड इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, महाड रायगड येथे ३० एप्रिल रोजी सकाळी १० वाजता शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील विद्यार्थ्यांसाठी वार्षिक दीक्षांत (पदवीदान) सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

महाविद्यालयाच्या सर्व पदवी प्राप्त विद्यार्थी व पालकांनी समारंभास उपस्थित राहून आपली पदवी स्वीकारावी असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य सुदेश कदम यांनी केले आहे.

## महाराष्ट्र दिनी पेणमध्ये वक्तृत्व स्पर्धा

**पेण : प्रतिनिधी**

महात्मा गांधी वाचनालय व साप्ताहिक गर्जा रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने १ मे रोजी महात्मा गांधी वाचनालय येथे खुल्या वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

या स्पर्धेत १२ स्पर्धकांनी भाग नोंदविला असून या स्पर्धकांना झूम मिटींगद्वारे विषय दिले आहेत. ही स्पर्धा नागरिकांना पाहण्यासाठी गांधी मंदिर येथे व्यवस्था करण्यात आली असून सायंकाळी ४ वाजता स्पर्धा सुरू होईल.

या स्पर्धेसाठी जय महाराष्ट्र माझा, पाणी पेटत आहे, निसर्ग माझा सखा, माझा शेतकरी बाप जगाचा पोशिंदा, समाज माध्यम विरुद्ध वृत्तपत्र, अमृत महोत्सवी भारत असे विविध विषय देण्यात आले आहेत. सहभागाचे आवाहन करण्यात आले आहेत.


मा. राव साहेब कोर्ट

### जाहीर नोटीस

प्रो. जमा. ५०

अर्जदाराचे वकील
ॲड. सत्यश्री महादेव गायकर
वकील उच्चन्यायालय

**पनवेल येथील मे. सिव्हील जज्ञ ज्यु.डी. यांचे कोर्टात**

दि. चौ. अर्ज नं. ५९५/२०२२
नि. ८ ड
ने.ता. २९/०६/२०२२

**१) श्रीमती वैशाली कैलास ठोंबरे**
वय ३० वर्षे, धंदा – नोकरी
**२) कु. संचिता कैलास ठोंबरे**
वय १९ वर्षे, धंदा – शिक्षण
**३) कु. रिध्दी कैलास ठोंबरे**
वय १५ वर्षे, धंदा – शिक्षण
**४) कु. मयुर कैलास ठोंबरे**
वय १२ वर्षे , धंदा – शिक्षण
} **अर्जदार**

**अ.क्र. १ स्वत:साठी व अ.क्र ३ ते ४ साठी अज्ञान पालनकर्ती आई**
**५) सौ. जनाबाई काशिनाथ ठोंबरे**
वय ६४ वर्षे, धंदा– गृहीणी
सर्व रा. भोकरपाडा, पो. पांयेजे ता. पनवेल, जि. रायगड.

ज्याअर्थी **कै. कैलास काशिनाथ ठोंबरे** हे दिनांक ८/१२/२०२० रोजी डी.वाय.पाटील हॉस्पिटल, नेरूळ नवी मुंबई येथे मृत्यू पावले आहेत.

**कै. कैलास काशिनाथ ठोंबरे** यांस अर्जदार हे कायदेशीर वारसदार आहेत. सबब अर्जदार सदरचा अर्ज करीत आहेत. सदर वारसाव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत, सबब सदरचा वारस दाखला अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाही असे समजून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

तारीख २६/०४/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

ठिकाण : पनवेल
दिनांक :
२६/०४/२०२२

**सही/-**
क. लिपिक
दि. न्या. व. स्तर, पनवेल

शिक्का

**सही/-**
सब. अधि.
दि. न्या. (व. स्तर), पनवेल



### जाहीर नोटीस

माझ्या अशिलांच्या वतीने सर्व जनतेस या नोटीसीद्वारे असे सुचित करण्यात येते की, खालील भुखंडाचे मालक **(१) श्री. मिथुन जनार्दन पाटील, (२) श्री. समाधान जनार्दन पाटील, (३) सौ. मनिषा गणेश गायकवाड, (४) सौ. जान्हवी धर्मा फडके, (५) श्रीमती. गुलाख जनार्दन पाटील** यांच्या नावे सिडकोकडून प्रस्तावित नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ व अनुषंगिक कामासाठी गावठाणामधील संपादीत करण्यात येणाऱ्या जमिनीबद्दल व त्यामधील स्थलांतरीत होणाऱ्या निवासी वापराच्या बांधकामाबद्दल नुकसान भरपाईपोटी व पुनः स्थापनेसाठी निवासी वापराकरीता **भुखंड क्र. १९, सेक्टर–आर –५, क्षेत्र ४१०.०० चौ. मी.** नोड – पुष्पक (वडघर), ता. पनवेल, जि. रायगड या वर्णनाचा भुखंड वितरीत झालेला आहे. सदर भुखंड माझे अशिल **मे. दुबे होम्स प्रा. लि. तर्फे संचालक (१) श्री. दयाशंकर रामचंद्र दुबे, (२) श्री. सचेंद्र दयाशंकर दुबे (३) श्री. नयरीत सचेंद्र दुबे,** कार्यालयिन पत्ता – फ्लॅट नं. १०१, गायत्री पॅराडाईज, प्लॉट नं. ५६, सेक्टर – ०३, करंजाडे, पारगाव, पनवेल – ४१०२०६. मुंबई यांच्या नावे खरेदी विक्रीच्या करारनाम्याद्वारे / त्रिपक्षिय करारनाम्याद्वारे कायमस्वरूपी हस्तांतरण करीत आहेत.

| नोड | सेक्टर | भुखंड क्रमांक | क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|---|
| पुष्पक (वडघर) | आर – ५ | १९ | ४१०.०० चौ.मी. |

तरी कोणीही व्यक्ती/ व्यक्तीचे किंवा अर्थिक संस्थांचे सदर भुखंड संदर्भात कुठल्याही प्रकारचे दावा, हरकती, जसे विक्री, खोजा, दान, गहाण, सरकारी निमसरकारी, कंपनी बक्षीस भाडेपट्टा, वारसा हक्क, लोन किंवा इतर काही असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसाचे आत या भुखंडाच्या संबंधित कागदपत्रासोबत माझ्या कार्यालयिन पत्त्यावर संपर्क साधावा. अन्यथा सदर भुखंडाच्या त्रिपक्षिय करारनाम्याद्वारे हस्तांतरण करण्याची प्रक्रीया पुर्ण करण्यात येईल. त्यानंतर आलेल्या कुठल्याही प्रकारच्या हरकती/तक्रारीचा विचार करण्यात येणार नाही. कृपया याची नोंद घ्यावी.

दि. २७/०४/२०२२

**सही/-**
**ॲड. निरंत वासुदेव पाटील**

**कार्यालय–** तळ मजला, प्लॉट नं. बी–४०, से.२०, अष्टविनायक बिल्डींग, नेरूळ गाव, नवी मुंबई–४००७०६. मो. ९३२४५६९८०६.



### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, आमचे अशिलांनी **श्री. हवागेप्पा मणीकप्पा हाळशेठ** यांचे मालकीची खालील वर्णनाची निवासी सदनिका खरेदी करण्याचे ठरवीलेले आहे. सदरहू निवासी सदनीकेचे वर्णन खालीलप्रमाणे :

**– मिळकतीचे वर्णन –**

**मौजे–कामोठे, ता. पनवेल, जि. रायगड,** येथील पनवेल महानगरपालीकेच्या हद्दीतील **सेक्टर १८ मधील प्लॉट क्र. ८२ वर बांधण्यात आलेल्या** भुमी हार्मोनी को. ऑप. हौ. सोसायटीमधील 'सी' विंग मधील आठव्या मजल्यावरील निवासी सदनीका क्र.८०४, क्षेत्र ७४.६६ चौ.मी. कारपेट अशा वर्णनाची मिळकत तिच्या सोबतच्या तदअनुशंगीक शेअर सर्टीफीकेट, पार्कींग क्र. १०७ इत्यादी सर्व लाभांसह.

तरी सदरहू वर नमुद मिळकतीबद्दल कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, तारण, भाडेकरुपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. वा तत्सम कोणतेही दावे मालकी व अन्य हक्क हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी वा संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांचे आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करुन कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्याकडे लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडूनही काहीही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदरहू मिळकत निर्वेध, निर्दोष व बोजाविरहीत असल्याचे गृहीत धरून आमचे अशिल सदरहू मिळकतीचा खरेदीचे व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

स्थान–कामोठे
दि. २७/०४/२०२२

**सही/-**
**ॲड नवीन वि. धोंगडी**

डी–४०१, ग्रिनस्केप रॉयल को. ऑप. हौ. सो. प्लॉट नं.२५, सेक्टर ७, कामोठे. नवी मुंबई–४१०२०९. मो. क्र. ९००४०८७८७३



### सावधान नोटीस

तमाम लोकांस या सावधान नोटीसने कळविण्यात येते आहे की, मौजे मोर्बे, ता. पनवेल, जि. रायगड येथील श्री.अनंत दत्तात्रेय नावडेकर यांचे नावे असलेली, ताबेकब्जातील व वहीवाटीतील, खुद्द स्वरूपाची खालील वर्णनाची शेत जमीन मिळकत खालील प्रमाणे आहे.

**शेतजमिनीचे वर्णन**
**मौजे – मोर्बे, तालुका–पनवेल, जिल्हा–रायगड.**

| सर्व्हे नं./गट नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| १३ | १/ब | १–४६–७०<br>पैकी १–००–७०<br>पो.ख.०–२०–००<br>**१–२०–७०** | ७.०१ |

सबब वरील शेत जमीन मिळकतीत आमचे अशिलांचा वारसाने हक्क लागत आहे. सदर मिळकत ही सामाईक मिळकत असल्या कारणाने आमच्या अशिलांना विश्वासात घेतल्याशिवाय सदर मिळकती संदर्भात श्री.अनंत दत्तात्रेय नावडेकर यांस बरोबर कोणीही कुठल्याही प्रकारचा खरेदी व्यवहार करू नये.

सदर मिळकतीमध्ये आमच्या अशिलांचा अविभक्त हिस्सा आहे. त्यामुळे या मिळकतीमध्ये इतर कोणीही त्रयस्थ इसमांनी हक्क व हितसबंध प्रस्थापीत करू नये. तरीही सबंधीत मिळकती संदर्भात आमचा हिस्सा/हक्क डावलून केलेला करार, लेख, समझोता, साठेकरार, खरेदीखत, वा अन्य कोणताही प्रकारचा दस्तऐवज आमच्या वर बंधनकारक राहणार नाही. सदर प्रकरणी कोणत्याही स्वरूपाचा करार केल्यास त्याच्या विरुध्द त्वरीत आवश्यक दिवाणी व फौजदारी स्वरूपाची कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

तरी तमाम जनतेला या सावधान नोटीसीद्वारे सुचित करण्यात येत आहे की, सदर मिळकती संदर्भात कोणीही कसल्याही प्रकारचा खरेदी व्यवहार करार करण्यात येऊ नये, केल्यास तो आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

दिनांक : २७/०४/२०२२

**सही/-**
**ॲड. अमोल एस. साखरे**

शॉप नं. १२८, नगरपालिका शापिंग कॉम्प्लेक्स, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड. मो.८६५२२३३७७१/९३२४३७२१६६



### जाहीर नोटीस

जाहीर नोटीस माझ्या अशिलांच्या वतीने सर्व जनतेश या नोटीसिद्वारे असे सुचित करण्यात येते की, खालील भुखंडाचे मालक **(१) श्री. मनोज बाळकृष्ण भोसले व (२) श्रीमती. शशिकला तुळशिशम घरत** यांच्या नावे सिडकोकडून प्रस्तावित नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ व अनुषंगिक कामासाठी गावठाणामधील संपादीत करण्यात येणाऱ्या जमिनीबद्दल व त्यामधील स्थलांतरीत होणाऱ्या निवासी वापराच्या बांधकामाबद्दल नुकसान भरपाईपोटी व पुनःस्थापनेसाठी निवासी वापराकरीता **भुखंड क्र. ६४, सेक्टर – आर – ३, क्षेत्र २३०.०० चौ.मी.** नोड – पुष्पक (वडघर), ता. पनवेल, जि. रायगड या वर्णनाचा भुखंड वितरीत झालेला आहे. सदर भुखंड माझे अशिल **मे. ओम शिवम बिल्डर्स प्रा. लि. तर्फे संचालक (१) श्री. आनंदप्रकाश रामलखन यादव व (२) श्री. जयप्रकाश रामलखन यादव,** कार्यालयीन पत्ता – बी – १०४, ओम शिवम रेसिडन्सी, प्लॉट नं. ८ अ + ९, सेक्टर – १७, कामोठे, नवी मुंबई. यांच्या नावे खरेदी विक्रीच्या करारनाम्याद्वारे/त्रिपक्षिय करारनाम्याद्वारे कायमस्वरूपी हस्तांतरण करीत आहेत.

| नोड | सेक्टर | भुखंड क्रमांक | क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|---|
| पुष्पक (वडघर) | आर – ३ | ६४ | २३०.०० चौ.मी. |

तरी कोणीही व्यक्ती/ व्यक्तीचे किंवा अर्थिक संस्थांचे सदर भुखंड संदर्भात कुठल्याही प्रकारचे दावा, हरकती, जसे विक्री, खोजा, दान, गहाण, सरकारी निमसरकारी, कंपनी बक्षीस भाडेपट्टा, वारसा हक्क, लोन किंवा इतर काही असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसाचे आत या भुखंडाच्या संबंधित कागद पत्रासोबत माझ्या कार्यालयिन पत्त्यावर संपर्क साधावा. अन्यथा सदर भुखंडाच्या त्रिपक्षिय करारनाम्याद्वारे हस्तांतरण करण्याची प्रक्रीया पुर्ण करण्यात येईल. त्यानंतर आलेल्या कुठल्याही प्रकारच्या हरकती/तक्रारीचा विचार करण्यात येणार नाही. कृपया याची नोंद घ्यावी.

दि. २७/०४/२०२२

**सही/-**
**ॲड. निरंत वासुदेव पाटील**

**कार्यालय–** तळ मजला, प्लॉट नं. बी–४०, से.२०, अष्टविनायक बिल्डींग, नेरूळ गाव, नवी मुंबई–४००७०६. मो. ९३२४५६९८०६.



### नमुना – १

### खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पद्धतीने ताब्यात घेण्याबाबत जाहीर नोटीस

उपविभागीय अधिकारी महाड यांचे
कार्यालय ता. महाड, जि. रायगड
दिनांक. २५/०४/२०२२

**क्रमांक :– भूसंपादन/कात–५/कोथेरी/ थे.ज.ख./२१५/ नोटीस/२०२१**

ज्याअर्थी, कार्यकारी अभियंता, हेटवणे मध्यम प्रकल्प विभाग कामार्ली तालुका पेण जि. रायगड यांनी कोथेरी धरणावर जाणारा पोहोच रस्त्यासाठी मौजे कोथेरी, ता. महाड या गावांतील खाजगी जमिनी कोथेरी धरणावर जाणारा पोहोच रस्त्यासाठीच्या, सार्वजनिक प्रयोजना करीता शासननिर्णय, महसूल व वन विभाग क्र.संकीर्ण–०३/२०१५/प्र.क्र. ३४/अ–२, दिनांक १२ मे २०१५ मधील तरतुदीस अनुसरून, खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पद्धतीने महसूल विभागातर्फे संपादन करणे संबंधी कार्यकारी अभियंता, हेटवणे मध्यम प्रकल्प विभाग कामार्ली तालुका पेण जि. रायगड यांनी त्यांचे कडील पत्र क्र. हेमप्रवि/भूसं/७३२/सन २०२०, दिनांक २२/०६/२०२० अन्वये प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, रायगड यांचेकडे सादर केला आहे.

आणि ज्याअर्थी मा. जिल्हाधिकारी, रायगड यांचे आदेश क्रमांक साशा/भूसं–६/मौजे कोथेरी /२०२० दिनांक १७/०८/२०२० अन्वये उक्त शासन निर्णय दिनांक १२ मे २०१५ आणि तदनुषंगिक शासन निर्णय, तसेच शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्र. एलक्यूएन ०१/२०१७/ प्र.क्र. १२/अ–२, दिनांक २५ जानेवारी २०१७ प्रमाणे कार्यवाही करण्याबाबत निर्देश देवून, प्राधिकृत केलेले आहे.

त्याअर्थी उक्त शासन निर्णय आणि शासन परिपत्रकातील तरतुदीनुसार, **मी प्रतिमा पुदलवाड – शेंगुलवार, उपविभागीय अधिकारी महाड, जि. रायगड** याद्वारे,

१. अनुसूची एक मध्ये नमूद खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी पद्धतीने कार्यकारी अभियंता, हेटवणे मध्यम प्रकल्प विभाग कामार्ली, तालुका पेण जि. रायगड यांचे नांवे घेण्याबाबत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहे.

२. प्रकल्पासाठी जमीन थेट खरेदी घेताना जिल्हास्तरीय समितीमार्फत भूसंपादन कायदा २०१३ मधील कलम २६ ते ३० च्या व शेड्युल –१ च्या तरतुदीनुसार संबंधित जमिनीसाठी परिगणित होणाऱ्या एकूण मोबदल्याच्या रकमेवर २५% रक्कम वाढीव देऊन, मोबदला निश्चित करण्यात येईल.

३. संबंधित भूधारकांकडून शासनाच्या प्रचलित धोरणाप्रमाणे खाजगी जमीन वाटाघाटीद्वारे कार्यकारी अभियंता, हेटवणे मध्यम प्रकल्प विभाग कामार्ली तालुका पेण जि. रायगड यांचे नावे खरेदी देण्यास स्वच्छेने तयार असल्याबाबत व जिल्हास्तरीय निश्चित केलेला मोबदला संपूर्णतः व अंतिमरित्या स्विकारण्यास तयार असल्याबाबतची संमतीपत्रे (विकल्प) मागवित आहे. ४. संबंधित भूधारकांची ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यानंतर विहित नमुन्यातील संमतीपत्र (विकल्प) उपविभागीय अधिकारी महाड व कार्यकारी अभियंता, हेटवणे मध्यम प्रकल्प विभाग कामार्ली तालुका पेण जि. रायगड यांचेकडे दाखल करावीत. ५. संमतीपत्राचा (विकल्प) विहित नमुना कार्यकारी अभियंता, हेटवणे मध्यम प्रकल्प विभाग कामार्ली तालुका पेण जि. रायगड यांच्या कार्यालयामध्ये उपलब्ध आहेत. तसेच सदर नमुना महामंडळाच्या प्राधिकृत अधिकाऱ्यामार्फत भूधारकांना उपलब्ध करून देण्यात येईल.

६. सदर प्रकल्पासाठी निश्चित करण्यात आलेल्या क्षेत्राच्या आराखड्याची प्रत उपविभागीय अधिकारी महाड व जिल्हा कार्यकारी अभियंता, हेटवणे मध्यम प्रकल्प विभाग कामार्ली तालुका पेण जि. रायगड यांच्या कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत भूधारकांना किंवा हितसंबंधित व्यक्तींना तसेच जनतेस निरीक्षणासाठी खुली ठेवण्यात आली आहे.

**अनुसूची– १**
**मौजे कोथेरी, ता. महाड, जि. रायगड**

| अ.नु. | स.नं / हि.नं | खरेदी करावयाचे क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|
| १ | ९५/४ | २.०० |
| २ | ९५/६ | ११.५० |
| ३ | ९५/७ | १४.०० |
| ४ | ९५/१२ | ९.५० |
| ५ | ९५/१४ | ५.५० |
| ६ | ९५/१५ | ०.५० |
| | **एकूण** | **४३.००** |

ठिकाण :– महाड
दिनांक :– २५/०४/२०२२

**सही/-**
**(प्रतिमा पुदलवाड – शेंगुलवार)**
सक्षम प्राधिकारी
तथा उपविभागीय अधिकारी
महाड विभाग महाड

जा.क्र. भूसंपादन/कात–५
कोथेरी/२०१५/२०२१

# आयपीएलमुळे एनएमएमटीच्या उत्पन्नात भर

■ वाहनतळ ते मैदान विशेष बससेवा
■ १० लाखांपेक्षा अधिक उत्पन्न

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

आयपीएलच्या सामन्यांमुळे एनएमएमटीच्या उत्पन्नात भर पडली आहे. नेरुळ येथील डॉ. डी. वाय. पाटील मैदानात आयपीएल सामान्यांसाठी नवी मुंबई परिवहन उपक्रमाने वाहनतळ ते मैदान अशा विशेष बसची सुविधा दिली. या सेवेला चांगला प्रतिसाद मिळाला असून यातून एनएमएमटीला १० लाखांपेक्षा अधिकचे उत्पन्न मिळाले आहे.

नवी मुंबई शहरातील नेरुळ येथील डॉ. डी. वाय. पाटील मैदानात आतापर्यंत आंतरराष्ट्रीय सामने झाले नाहीत. एक दिवसीय एका सामान्याचे आयोजन या मैदानावर करण्यात आले होते, परंतु त्यावेळीही पावसामुळे ऐनवेळी सामना रद्द करण्यात आला होता. आता आयपीएल सामन्यांसाठी या मैदानाला पसंती दिली जाते. यावर्षी आयपीएलचे २० सामने या मैदानावर आयोजित करण्यात आले आहेत. त्यातील १३ सामने आतापर्यंत झाले आहेत.

या सामन्यांसाठी महापालिका प्रशासनाने पार्किंगसाठी व्यवस्था केली आहे. वंडर्स पार्क, यशवंतराव चव्हाण मैदान तसेच रहेजा व माईन्ड स्पेस या ठिकाणी वाहनतळ व्यवस्था केली आहे, परंतु या वाहनतळांपासून या मैदानात जाण्यासाठी एनएमएमटीची विशेष बस सेवाही देण्यात आली. नेरुळ रेल्वेस्थानकापासून ही बससुविधा देण्यात आली आली. सामना पाहण्यासाठी मैदानात जाण्यासाठी व सामना संपल्यानंतर वाहनतळापर्यंत जाण्यासाठी एनएमएमटीच्या बसगाड्यांचा वापर करण्यात येत होता. प्रत्येक सामन्यावेळी सरासरी १५ बस या वाहतुकीसाठी ठेवण्यात आल्या होत्या. त्यातून पालिकेला प्रत्येक सामन्यागणिक एक लाखांचे उत्पन्न मिळत असल्याची माहिती एनएमएमटी प्रशासनाने दिली आहे.



**आयपीएलचे शहरात डॉ. डी. वाय. पाटील स्टेडियमवर सामने होत असून प्रवासाच्या सुविधेसाठी एनएमएमटीकडून बसगाड्यांची सुविधा देत आहे. २५ बसच्या माध्यमातून एनएमएमटीला प्रत्येक सामन्यागणिक उत्पन्नात एक लाखांची वाढ होत आहेत, तसेच सामन्यासाठी येणारे प्रेक्षकही सुविधेबाबत समाधानी आहेत.**

**–योगेश कडुस्कर, एनएमएमटी, व्यवस्थापक**

# नवी मुंबईत मलवाहिन्या सोडल्या जाताहेत गटारांत

## स्वच्छता कर्मचाऱ्यांचा होतोय दुर्गंधीशी सामना

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

दरवर्षीप्रमाणे यंदाही शहरात पालिकेतर्फे पावसाळापूर्व गटारे व नाल्यांच्या साफसफाईला वेग आला आहे, मात्र घरांतील मलवाहिन्या थेट गटार आणि नाल्यात सोडण्यास मनाई असताना त्या थेट सोडल्या जात असल्याने स्वच्छता कर्मचाऱ्यांना घाण व दुर्गंधीचा सामना करावा लागत आहे. यात त्यांच्या आरोग्याचा प्रश्न उभा राहत असल्याने स्वच्छता कर्मचारी चिंतेत आहेत.

पावसाळ्यात गटारे व नाल्यात पाणी साचू नये, याची खबरदारी म्हणून पालिका प्रशासन दरवर्षी लाखो रुपये खर्चून स्वच्छ करीत असते. नवी मुंबईतील गटारे आणि ८० नाले पावसाळ्याच्या एक–दीड महिना आधी स्वच्छ केले जातात. यावर्षी आयुक्तांनी १५ मे ही डेडलाईन दिली आहे. त्यानुसार गाळ, माती, कचरा, प्लास्टिक, साहित्य काढून तुर्भे येथील क्षेपणभूमीत टाकले जात आहे पण काही ठिकाणी गटार व नाल्यांत थेट मलवाहिन्या सोडण्यास मनाई असतानाही त्या सोडल्यामुळे स्वच्छता कर्मचाऱ्यांना दुर्गंधीचा सामना करावा लागत आहे.

झोपडपट्टी, गावठाण व गावठाण विस्तार परिसरात मलनि:सारण वाहिन्यांचे जाळे पसरवण्यास आजही पालिकेला अपयश आले आहे. त्यामुळे बहुतांशी घरांचे मलयुक्त पाणी थेट गटार व नाल्यात सोडले जात आहे. आता पावसाळापूर्व गटारातील कचरा किंवा घाण साहित्य काढताना स्वच्छता कर्मचाऱ्यांना माती किंवा गाळ यापेक्षा जास्त मानवी शौचाचा सामना करावा लागत आहे. नाकाला मास्क लावूनच गटारे साफ करावी लागत आहेत.

यामुळे अनेकदा कर्मचाऱ्यांना गुदमरल्यासारखे होत आहे. यात त्यांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

## निवडक

### मुंबई–पुणे एक्स्प्रेस वेवर ट्रेलर उलटला

**पनवेल** : भरधाव वेगाने आपल्या ताब्यातील ट्रेलर घेऊन जात असतांना वाहनावरील ताबा सुटल्याने ट्रेलर डाव्या बाजूच्या लोखंडी डिव्हायडर जाऊन पलटी झाल्याने ड्रायव्हर व क्लिनर जखमी झाल्याची घटना पनवेलजवळील यशवंतराव चव्हाण द्रुतमार्गावर मुंबई –पुणे लेनवर चिखले रेल्वे ब्रिजखाली घडली. ट्रेलरचालक सचिन साळवी (३२) रा. घणसोली हा त्याच्या ताब्यातील ट्रेलर एमएच ०६ एक्यू १३४ हे वाहन घेऊन भरधाव वेगाने जात असतांना वाहनावरील ताबा सुटल्याने हा ट्रेलर डाव्या बाजूच्या लोखंडी डिव्हायडर जाऊन डाव्या बाजूस पलटी झाला. या अपघातात चालक स्वतः जखमी झाला आहे तसेच त्याचा सहकारी क्लिनर राजेश जाधव वय (३२) रा. दिवा हा सुद्धा जखमी झाला आहे. या आपघाताची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### महिलेशी असभ्य वर्तन; गुन्हा दाखल

**पनवेल** : शेजारी राहणाऱ्या महिलेशी जवळीक साधण्याच्या उद्देशाने घरामध्ये घुसून महिलेशी असभ्य वर्तन केल्याबद्दलची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. तालुक्यातील हेदुटणे गावात राहणाऱ्या एका तरूणाने महिला घरात एकटी असल्याचे पाहून त्यांच्या घरामध्ये प्रवेश करून महिलेशी असभ्य वर्तन केल्याने याबाबतची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### नवीन पनवेल येथे रोगनिदान शिबिर

**पनवेल** : अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ सेवा व आध्यात्मिक विकास मार्ग दिंडोरीप्रणित पनवेल शाखेतर्फे हनुमान मंदिर, नवीन पनवेल येथे श्री स्वामी समर्थ पुण्यतिथीनिमित्त अखंड नामजप यज्ञ सोहळ्याचे नियोजन केले आहे. यानिमित्ताने सर्व रोगनिदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिराला स्वामी सेवकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. डॉ. दिलीपकुमार पाटील व डॉ. गभाले यांच्या सहकार्याने शिबिर होऊन २८० रुग्णांनी याचा लाभ घेतला. यासोबतच श्री गुरूचरित्र, भागवत, नवनाथ या ग्रंथाचे पारायण, प्रहरसेवा, नित्य विशेष याग, त्रिकाळ आरती तसेच विविध आध्यात्मिक कार्यक्रम उत्साहात पार पडले.



# झोपडपट्टीमुक्तीकडे पनवेलची वाटचाल

## महापालिका करणार ७८९ घरांची निर्मिती



**खारघर : वार्ताहर**

केंद्र शासनाने सर्वांसाठी घरे या संकल्पनेच्या आधारे पनवेल महापालिकेने सकारात्मक कार्यवाही सुरू केली आहे. पालिका क्षेत्रात तीन प्रकल्पांना केंद्र आणि राज्य शासनाची मंजुरी मिळाली असून पहिल्या टप्प्यात वाल्मिकी नगर, लक्ष्मी वसाहत, महाकाळी नगर या झोपडपट्टीवासीयांचे पुनर्वसन केले जाणार आहे. या प्रकल्पांतर्गत सुमारे ७८९ घरांची निर्मिती केली जाणार आहे.

या प्रकल्पांकरिता पालिकेने मंगळवारी (दि. २६) सुमारे १२०.३६ कोटींची निविदा जाहीर केली. या प्रकल्पातील ७८९ घरांमध्ये झोपडपट्टीवासियांसह १७४ अत्यल्प व १५० अल्प उत्पन्न गटातील गरजूंनाही घरे दिली जाणार आहेत. २०२२ ते २०२५पर्यंत ही घरे पूर्ण करण्याचा कार्यकाळ दिला आहे. सध्याच्या वाल्मिकी नगर, महाकाली नगर येथील भूखंड व पनवेल शहरातील टपाल नाका येथील पालिकेच्या मोकळ्या भूखंडावर हे प्रधानमंत्री आवाज योजनेअंतर्गत घरांची निर्मिती केली जाणार आहे. ३० स्क्वे. मी. (एडब्ल्यूएस), ४५ स्क्वे. मी. (एलआयजी )स्वरूपाची ही घरे असणार आहेत. पनवेल महानगरनगरपालिकेच्या आत्तापर्यंत तीन प्रकल्पाना मंजुरी मिळाली आहे.

दुसऱ्या टप्प्यात कच्छी मोहल्ला, पटेल मोहल्ला आणि तिसऱ्या टप्प्यात अशोकबाग, तक्का वसाहत आणि इंदिरानगर या झोपडपट्टीमधील रहिवाशांचे पुनर्वसन केले जाणार आहे. या तीन प्रकल्पात एकूण जवळपास ३९०० घरांची निर्मिती केली जाणार असून यामध्ये २,०६२ झोपडपट्टी वासियांना घरे मिळणार आहेत.

# रेल्वेस्थानकांमध्ये फेरीवाल्यांचा सुळसुळाट

## सिडको, पोलिसांकडून कारवाईची अपेक्षा

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल, खान्देश्वर, मानसरोवर तसेच खारघर रेल्वे स्थानक व परिसरात परप्रांतीय फेरीवाल्यांनी अतिक्रमण करून व्यवसाय थाटले आहेत. त्यामुळे गर्दीच्या वेळी ये–जा करताना प्रवाशांची गैरसोय होते. सिडको आणि रेल्वे पोलीस याकडे दुर्लक्ष करीत असल्यामुळे प्रवासीवर्गात नाराजी पसरली आहे.

स्थानकाचे प्रवेशद्वार असलेल्या मोकळ्या जागेत कपडे, खेळणी, खाद्यपदार्थ, मोबाईल कव्हर आदी विविध वस्तू विक्री करणाऱ्या फेरीवाल्यांनी व्यवसाय थाटले आहेत. प्रवाशांच्या सुरक्षेसाठी स्थानकात रेल्वे पोलीस तैनात असतात, मात्र तरीही फेरीवाल्यांनी स्थानकाच्या स्वच्छतागृह, तिकीट खिडकी आणि प्रवेशद्वाराच्या परिसरात कब्जा केला आहे. चार वर्षांपूर्वी एल्फिन्स्टन रेल्वे स्थानक पुलाच्या फेरीवाल्यांना रेल्वे स्थानकाच्या दुर्घटनेनंतर १५० मीटर परीक्षेत्रात मुंबई उच्च न्यायालयाने मज्जाव केला आहे.

फेरीवाल्यांमुळे गर्दीच्या वेळी स्थानकातून बाहेर पडणाऱ्या प्रवाशांची गैरसोय होते. त्यामुळे याबाबत त्वरीत योगय ती कारवाई करण्याची मागणी प्रवाशांमधून होत आहे.


# पनवेल मनपा हद्दीतील धोकादायक फांद्या छाटल्या

## नगरसेवक राजू सोनी यांचा पुढाकार

**पनवेल : वार्ताहर**

महापालिका हद्दीतील मिरची गल्ली येथील पिंपळाच्या झाडाच्या धोकादायक फांद्या नगरसेवक राजू सोनी यांच्या पुढाकाराने काढण्यात आल्या आहेत.

शहरातील प्रभाग क्रमांक १९मधील मिरची गल्ली येथे पिंपळाच्या झाडाची वाढ होऊन त्या झाडाच्या फांद्या विद्युतवाहिनीच्या मुख्य लाईनवर अनेक दिवसांपासून लटकत होत्या. त्यामुळे अपघात होण्याची शक्यता होती. येथील काही व्यापाऱ्यांनी सभागृह नेते परेश ठाकूर व नगरसेवक राजू सोनी यांना सांगितले. त्यांनी लगेच महावितरण अधिकाऱ्यांची संपर्क साधून ती लाईन बंद करण्यास सांगितले. पनवेल महानगरपालिका वृक्ष



प्राधिकरणाशी संपर्क साधून या लाईनवर लटकत असलेल्या फांद्यांची छाटणी करण्यास सांगितले. नगरसेवक राजू सोनी यासाठी स्वखर्चाने क्रेन बोलवून त्या कामास सुरुवात करण्यात आली. त्यामुळे येथील नागरिकांनी सभागृह नेते परेश ठाकूर व राजू सोनी यांचे आभार मानले.

# घराच्या पोटमाळ्यावर आढळला मृतदेह

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

गोवंडीच्या झाकीर हुसेननगरातील झोपड्याच्या पोटमाळ्यावर बुधवारी (दि. २७) सकाळी मृतदेह आढळला आहे.

मागील तीन दिवसांपासून या घराचा दरवाजा आतून बंद होता. दुर्गंधी येऊ लागल्यावर शेजारील रहिवाशांनी देवनार पोलिसांना याविषयी माहिती दिली. पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन उत्तरीय तपासणीसाठी घाटकोपरच्या राजावाडी रुग्णालयात पाठवला आहे. आजारपणामुळे मृत्यू झाला असल्याचा प्राथमिक अंदाज वर्तवला जात आहे. घाटकोपर–मानखुर्द जोडरस्त्यालगत असलेल्या झाकीर हुसेननगरातील झोपड्यातून दुर्गंधी येत होती. रहिवाशांनी बुधवारी सकाळी याविषयी देवनार पोलिसांना याची माहिती दिली. पोलिसांनी तत्काळ त्या ठिकाणी धाव घेत अग्निशमन दलाच्या मदतीने त्या झोपडीचा दरवाजा तोडला. आत प्रवेश केल्यावर पोटमाळ्यावर एक जण मृतावस्थेत आढळला. त्याच्या शेजारी औषधांची चिठ्ठी व औषधे आढळली असून हा मृत्यू आजारपणामुळे झाल्याचा प्राथमिक अंदाज वर्तवला जात आहे. देवनार पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद करीत तपासाला सुरुवात केली आहे. मृत व्यक्तीचे नाव कळू शकले नाही.

# भारनियमन नागरिकांवर थोपवू नका -गणेश भगत

**नवी मुंबई : बातमीदार**

नेरूळ नोडमध्ये सातत्याने वीजपुरवठा खंडित होत आहे. यासाठी वीज वाहिन्यांचा दोष आहे की, भारनियमन सुरू केले आहे याबाबत संभ्रम निर्माण झाला आहे, मात्र करदात्या नागरिकांवर भारनियमन थोपवू नका, अशी मागणी भाजपचे गणेश भगत यांनी महावितरणच्या कार्यकारी अभियंत्यांकडे एका लेखी निवेदनातून केली आहे.

गेल्या काही दिवसांपासून नेरूळ पश्चिम परिसरात वीजपुरवठा खंडित होण्याच्या घटना वाढीस लागल्या आहेत. रात्रीच्या वेळीही दोन ते चार तास वीजपुरवठा खंडित होत आहे. भारनियमन सुरू केले असेल तर नेरूळ पश्चिमेला कोणत्या विभागात, कोणत्या सेक्टरमध्ये कोणत्या वेळेला व किती वेळ वीजपुरवठा होणार नाही याचे वेळापत्रक महावितरणने रहिवाशांच्या माहितीस्तव प्रकाशित करणे आवश्यक आहे. कडाक्याच्या उन्हाने रहिवाशी, त्रस्त झाले आहेत. त्यामुळे भारनियमनाचा भार कमी करावा, अशी मागणी गणेश भगत यांनी निवेदनातून केली आहे.



# नैना प्रकल्पाच्या नियमावलीतील टीडीआरमध्ये सुधारणा करण्याची मागणी

**नवी मुंबई : बातमीदार**

नैना क्षेत्रासाठी विकास नियंत्रण नियमावली व विकास आराखडा मंजूर करण्यात आलेला आहे. या प्रकल्पाच्या नियमावलीतील टीडीआरमध्ये सुधारणार करण्याची मागणी नैना बिल्डर वेल्फेअर असोसिएशन व विकसक प्रकाश बाविस्कर यांनी अधिकाऱ्यांकडे केली आहे.



प्रारूप विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली प्रसिद्ध होऊन जवळपास पाच वर्षे पूर्ण झालेली आहेत. जमीनमालकाने उपरोक्त नोटीफिकेशन प्रसिद्ध झाल्यापासून अनुक्रमे पाच वर्षांच्या आत जमीन भूसंपादनाच्या मोबदल्यात टीडीआर मिळणेसाठी अर्ज सादर केल्यास त्यास २०, १५, १० आणि ५ टक्के इन्सेटिव्ह टीडीआर मिळेल, अशी तरतूद नियमावलीमध्ये होती. या नियमाप्रमाणे ज्यांनी अर्ज पूर्वीच सादर केलेले आहेत. त्या अर्जावर नैनाकडून अद्याप कार्यवाही झालेली नाही. नवीन नोटिफिकेशन प्रसिद्ध झाल्याच्या पूर्वीची सादर झालेली प्रकरणे निकाली काढण्याच्या अनुषंगाने नोटिफिकेशनमध्ये सुस्पष्ट सुधारणा व्हाव्यात, अशी मागणी केली आहे.

नैना क्षेत्राच्या मंजूर विकास नियंत्रण नियामावलीतील टिडीआरच्या तरतूदीत सुधारणा करण्याबाबत सूचना व हरकती मागविण्यासाठी अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आलेली होती. या अनुषंगाने नैना बिल्डर वेल्फेअर असोसिएशनचे प्रकाश बाविस्कर यांना याबाबतच्या सुनावणीसाठी नैना –सिडको महामंडळाकडून निमंत्रित करण्यात आले होते. २ मार्च २०२२ रोजीच्या अधिसूचनेतील सुधारणांवरील सूचना, हरकतींच्या अनुषंगाने मंगळवारी (दि. २६) सिडको यांच्या कार्यालयात सुनावणी घेण्यात आली. नैना बिल्डर वेल्फेअर असोसिएशन व प्रकाश बाविस्कर यांनी टिडीआरच्या तरतूदीबद्दल विहीत कालावधीत त्यांच्या सूचना, हरकती नैना–सिडको यांचेकडे दिलेल्या आहेत. या अर्जावर कारवाई करणेबाबत स्पष्टता करावी, अशी मागणी प्रकाश बाविस्कर यांनी केली. या वेळी वरिष्ठ विधी सल्लागार ॲड. प्राचाली पाटील, वास्तुविशारद व नगररचनाकार भाग्यश्री गपट–पाटील यांनी आपले म्हणणे सादर केले. नैना–सिडकोच्या वतीने मुख्य नियोजनकार रविंद्रकुमार मानकर, सहयोगी नियोजनकार शुभांगी भिष्णूरकर, अधिकारी उपस्थित होते.

# आयुष्मान भारत योजनेंतर्गत पाच लाखांपर्यंतचे उपचार मोफत

**खारघर, पनवेल : वार्ताहर**

वार्षिक एक लाखापर्यंतचे उत्पन्न असणाऱ्यांच्या कुटुंबियांना पाच लाखांपर्यंतचा आरोग्य विमा दिला जात आहे. महात्मा फुले आरोग्य योजना आणि प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेशी जोडलेल्या सर्व रुग्णालयात या अंतर्गत उपचार मिळतील. यासाठी प्रत्येक जिल्ह्यात हेल्थकार्ड वाटप केले जात आहेत. रायगड जिल्ह्यातील सर्वांत मोठा तालुका म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पनवेल तालुक्यातदेखील या योजनेचे कार्डवाटप केले जाणार आहे.

रायगड जिल्ह्यात पनवेल हा सर्वात मोठा तालुका आहे.जिल्ह्यात या योजनेचे ४ लाख ३५ हजार लाभार्थी आहेत. यापैकी ७० हजारपेक्षा लाभार्थी पनवेल मध्ये असुन या लाभार्थ्यांचे कार्डदेखील तयार झाले आहेत. त्यासाठी काही आवश्यक पात्रता निर्धारित करण्यात आली आहेत. आयुष्मान भारत व महात्मा फुले जण आरोग्य योजना या एकत्रित राबविल्या जात आहे.

महात्मा फुले जनआरोग्य योजनेकरीत केशरी, पांढरे, पिवळे हे रेशनकार्डधारक पात्र असणार आहेत, तर आयुष्मान भारत करिता २०११च्या सामाजिक आर्थिक जनगणनेच्या आधारे पात्र लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळणार आहे. रायगड जिल्ह्यात ४४७ आपले सरकार केंद्र आहेत. या केंद्रांवर लाभार्थ्यांना आयुष्मान भारतमध्ये नाव असेल तर कार्ड प्राप्त करून घेता येणार आहे, तसेच नाव नसेल तर म. फुले जनआरोग्य योजनेचा लाभ घेता. पनवेलमध्येदेखील हे केंद्र कार्यान्वित आहेत. त्यासाठी आधार कार्ड, रेशन कार्ड ही दोनच कागदपत्रे आवश्यक आहेत. पनवेल परिसरातील एमजीएम रुग्णालय कामोठे, एमजीएम रुग्णालय कळंबोली, लाईफ लाईन हॉस्पिटल, पटवर्धन रुग्णालय, बिरमोळे रुग्णालय कामोठे, पनवेल हॉस्पिटल, श्री साई मल्टिफेशालिस्ट खारघर, श्री सिद्धिविनायक हॉस्पिटल कळंबोली, आयएमटी खारघर, सत्य साई संजीवनी हॉस्पिटल खारघर, टाटा एक्ट्रेक्ट सेंटर खारघर, उपजिल्हा रुग्णालय पनवेल येथे होणार आहेत.

**आयुष्मान भारत आणि महात्मा फुले जण आरोग्य योजनेची एकत्रित अंमलबजावणी केली जात आहे. कोविड रुग्णांनादेखील या योजनांचा लाभ झाला आहे.**


**–डॉ. वैभव गायकवाड, जिल्हा योजना समन्वयक**

# पडसरे पूल मोजतोय अखेरची घटका

## ग्रामस्थांसह शेकडो विद्यार्थ्यांचा जीव टांगणीला

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यातील पडसरे गावाजवळील पुलाची प्रचंड दूरवस्था झाली आहे. पडसरे गावासह, लोळगेवाडी, एकलघर व अनुदानित आदिवासी आश्रमशाळेला जोडणारा हा एकमेव पूल आहे. पुलावरून ग्रामस्थांसह आश्रमशाळेतील शेकडो विद्यार्थी येथून ये -जा करतात. पावसाळ्यात पूल अचानक ढासळल्यास मोठी दुर्घटना घडू शकते. त्यामुळे पुलाची दुरूस्ती करण्याची मागणी होत आहे.





(छाया : धम्मशील सावंत)

काही दिवसांपूर्वी श्री दत्तगुरु ग्रामस्थ मंडळ पडसरे यांच्यातर्फे महागाव सरपंचांना पूल दुरूस्तीसंदर्भात निवेदन देण्यात आले आहे. पडसरे आश्रमशाळेत सुधागडसह इतर तालुक्यातील ५०० हून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. त्यामुळे या पुलावरून सतत ये -जा सुरू असते. शिवाय गावकरी व आश्रमशाळेतील कर्मचारी वर्ग दैनंदिन गरजेसाठी लागणाऱ्या साहित्याची ने -आणसुद्धा या पुलावरून करतात.

या पुलाखालून मोठा धबधबा वाहतो. पुलाची सध्याची दूरवस्था झाली असल्याने पावसाळ्यात प्रचंड रौद्ररूप धारण करणाऱ्या धबधब्याच्या प्रवाहात हा पूल किती तग धरेल याची चिंता ग्रामस्थ, आश्रमशाळेतील शिक्षक, विद्यार्थी-पालकांना भेडसावत आहे. त्यामुळे या पुलाची दुरूस्ती लवकरात लवकर करण्याची मागणी होत आहे.

***पूल नव्याने उभारण्याची गरज***

*या पुलाच्या प्लास्टरमधून लोखंडी सळ्या बाहेर पडल्या आहेत तर काही खाली कोसळल्यादेखील आहेत. पुलाचे संरक्षक कठडे तुटले आहेत. अनेक ठिकाणी प्लास्टर निघाले आहे. सर्वत्र गवताचे आच्छादन आहे. त्यामुळे पूल नव्याने उभारण्याची गरज आहे.*

**पूल दुरूस्तीसंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पत्रव्यवहार केला आहे तसेच संबंधित अधिकाऱ्यांची भेटदेखील घेण्यात येणार आहे. पूल दुरूस्तीसाठी सातत्याने पाठपुरावा सुरू आहे.**

**-भास्कर पार्टे, सरपंच, महागाव ग्रामपंचायत**

## कर्जत गारपोली येथे सिलिंडरचा स्फोट; दुकानाचे मोठे नुकसान

**कर्जत : बातमीदार**

तालुक्यातील गारपोली येथे मंगळवारी (दि. २६) रात्री दुकानातील सिलेंडरचा स्फोट होऊन संपूर्ण दुका जळून खाक झाले आहे.



कल्याण -कर्जत राज्यमार्गावर गारपोली गावाशेजारी जीवन शिंदे यांचे अल्पोपहार आणि चहाचे दुकान आहे. या दुकानात नाश्ता तयार करण्यासाठी असलेली शेगडी व सिलिंडरसह तेल असे ज्वलनशील साहित्य होते. मंगळवारी रात्री दुकान बंद करताना शिंदे यांनी देवघरात लावलेला दिवा नेहमीप्रमाणे तेवत ठेवला होता. रात्री १०.३० वाजण्याच्या सुमारास त्या दुकानातील गॅस सिलिंडरचा स्फोट झाला. बाजूलाच प्रतीक्षा लॉनमध्ये कीर्तनाचा कार्यक्रम सुरू होता. आगीचा भडका उडताच अवघ्या दोन मिनिटांत शेकडो लोक तेथे पोहचले.

आगीचा भडका एवढा मोठा होता की, आग विझवणे सहज शक्य नव्हते. या आगीत संपूर्ण दुकान जळून खाक झाले. यात ४०-४५ हजारांचे नुकसान झाले आहे. ही आग लागली त्या ठिकाणापासून ५० मीटर अंतरावर मुख्य रस्त्यावर मागील वर्षी मार्च महिन्यात रिक्षा आणि कार यांच्या धडकेत रिक्षा जळून तिघांचा होरपळून मृत्यू झाला होता.

# अतिरिक्त सुरक्षा ठेव रकमेच्या नावाखाली लूट थांबवा

## अन्यथा भाजप मोठे आंदोलन करणार; युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष अमित घाग यांचा इशारा

**धाटाव : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळाच्या माध्यमातून मार्च महिन्यात ग्राहकांना दोन बिले अदा करण्यात आलेली आहेत. त्यातील एक बिल हे अतिरिक्त अनामत सुरक्षा ठेव रक्कम असल्याबाबत दिले गेले आहेत. त्यामुळे सर्वच ग्राहकांमध्ये संभ्रमाचे वातावरण तयार झालेला आहे. आधीच महागाईच्या खाईत सामान्यांना लोटल्यानंतर अतिरिक्त सुरक्षा ठेव रकमेच्या नावाखाली करण्यात येणारी लूट राज्य शासनाने थांबवावी, अन्यथा भाजपच्या वतीने मोठे जनआंदोलन करण्यात येईल, असा इशारा दक्षिण रायगड भारतीय जनता युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष घाग यांनी निवेदनातून दिला आहे.

बुधवारी (दि. २७) रोहा वीज वितरण कार्यालयात याबाबत निवेदन देण्यात आले. या वेळी रोहा तालुका युवा मोर्चाध्यक्ष राजेश डाके, शहर भाजप नेते शैलेश रावकर, तालुका कामगार आघाडी अध्यक्ष विलास डाके यांसह भाजप पदाधिकारी उपस्थित होते. एकीकडे महावितरण विभागाच्या माध्यमातून ग्राहकांकडून मीटरची सुरक्षा ठेव रक्कम असतानाही अशा पद्धतीने सामान्य जनतेच्या खिशातून हे सरकार पैसे लुटत आहे. त्यांनी तो प्रकार थांबवावा अथवा सामान्य जनतेच्या रोषाला सामोरे जावे लागेलच, परंतु भारतीय जनता पक्ष अशा लुटारू महावितरणाच्या कारभाराविरुद्ध आंदोलन छेडल्याशिवाय राहणार नाही, असा इशारा देण्यात आला आहे.



भारतीय जनता पक्षाने याबाबत आवाज उठविताच, महावितरणच्या रोहा कार्यालयातील ज्युनियर अभियंता निकेतन फलके व केरू पाटील यांनी, ज्या ग्राहकांना अशा पद्धतीने बिल दिले गेले असतील तर ती टप्प्याटप्प्याने भरावी, असे सांगितले आहे.


CIDCO
WE MAKE CITIES

# CITY AND INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA Ltd.

# शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ महाराष्ट्र मर्यादित

## NOTICE

[ UNDER SECTION 61(1) OF THE MAHARASHTRA REGIONAL & TOWN PLANNING ACT, 1966.]
TOWN PLANNING SCHEME NO. 05
NO. CIDCO/NAINA/TPS-5/2022/

WHEREAS, the Government of Maharashtra in exercise of powers conferred under clause (b) of Sub-section (1) of the Section 40 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as “the said Act”) declared by Notification, No. TPS -1712/ 475/ CR-98/ 12/ UD-12, dated 10th January, 2013 and subsequent amendment (hereinafter referred to as “the said Notification”) City and Industrial Development Corporation of Maharashtra Limited (being a company owned and controlled by the Government of Maharashtra) (hereinafter referred to as “the Corporation”) as Special Planning Authority (hereinafter referred to as “the SPA”) for Navi Mumbai Airport Influence Notified Area (NAINA) (hereinafter referred to as “said notified area”) as specified therein.

And whereas, the Government of Maharashtra vide Notification No. TPS-1215/245/CR-332/2015/SM/UD-12, dated 27th April 2017 has sanctioned the Interim Development Plan (IDP) for the 23 villages of NAINA under Section 31(1) of the said Act, and vide Notification No. TPS. 1215/245/C.R.332/16/EP/UD-12, dated 1st March 2019 has sanctioned the Excluded Parts of the IDP.

And whereas, the Government of Maharashtra vide Notification No. TPS-1717/MIS-2750/C.R.91/2019/UD-12, dated 16th September, 2019 has sanctioned the Development Plan (DP) for 151 villages of NAINA u/s 31(1) of the MR & TP Act, 1966.

And whereas, as per sub- Section (1) of Section 60 of the said Act CIDCO’s Board vide Resolution No 12189, dated 7th June 2019, had declared its intention for making of Town Planning Scheme No. 5 (TPS-5) at Part of Villages Bonshet, Bhokarpada (Chipale), Devad, Moho, Shivkar, Vichumbe and Vihighar of Taluka – Panvel, District Raigad and a notice about declaration of making TPS-5 as per provision in Section 60(2) of the Act, has been published in the Extraordinary official Maharashtra Government Gazette (part-II) dated 26th June 2019 as well as in the daily newspapers “Raigad Nagari”(Marathi) and “Newsband”(English) dated 1st July 2019 and 10th July 2019 respectively.

And whereas, as per Section 61 (1) of the said Act, the Planning Authority shall, in consultation with the Director of Town Planning, make a draft scheme for the area in respect of which the declaration was made, and publish a notice in the Official Gazette within nine months or within the extended period from the date of the declaration.

And whereas, the Joint Director of Town Planning, Konkan division vide Order No TPS No 5/NAINA/Sect 61(3)/Time-limit Extension/JTDP-KDN/2059, dated 4th March, 2020 has granted extension of three months’ time i.e. up to 24th June 2020 for making and publication of the said draft scheme.

And whereas, after conducting owners meet on 5th and 6th March, 2020, as per rule No 4(1) of TPS Rules 1974 by calling all the land owners for discussion and after incorporating suggestions received from the owners, consultation was sought vide submission dated 20th March 2020 from the Director of Town Planning, GoM, as per Section 61 (1) of the said Act and as per rule no 4 (2) of TPS Rules 1974.

And whereas, vide Government ordinance dated 31st August 2020 and its enactment dated 14th September 2020, the period of lockdown measures by the Government is excluded while calculating the timelines under section 148-A of the MR&TP Act.

And whereas, the Director of Town Planning vide letter जा. क्र. नैना नरयो क्र.5/ प्र.क्र.72/ 20/ टिपीव्ही-3/ 1352 दि. 5th March 2021 had offered consultation on TPS-5.

And whereas, necessary changes suggested by Director of Town Planning in the consultation have been incorporated in the draft TPS-5.

Now, therefore, in accordance with provisions of section 61(1) of the said Act, it is hereby declared that the draft TPS-5 has been made and is hereby published.

A copy of the draft TPS-5 plans along with corresponding Special Development Control Regulations are made available for inspection by the public during office hours on all working days in the office NAINA, 8th floor, Tower No. 10, Belapur Railway Station Complex, CBD Belapur, Navi Mumbai 400614. The same is uploaded on website of CIDCO i.e. https://cidco.maharashtra.gov.in//naina.

In accordance with the provisions of section 67 of the said Act, if within thirty days from the date of publication of this notice in the Maharashtra Government Gazette any person affected by the said TPS-5 communicates in writing any objections and /or suggestions relating to the said scheme to the Chief Planner, NAINA, shall consider the same and modify the said draft scheme as it thinks fit, before submitting the said draft scheme under section 68(1) of the said act, to the Government for sanction.

By the order of Board of Directors of the Corporation.

Place: Navi Mumbai
Date : 25/04/2022

**Ravindrakumar Mankar**
**Chief Planner (NAINA)**

Regd. Office: Nirmal, 2nd floor, Nariman point, Mumbai-400021

CIN - U99999 MH 1970 SGC-014574

www.cidco.maharashtra.gov.in

## सूचना

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम ६१ च्या उपकलम (१) नुसार**
**नगररचना परीयोजना क्रमांक ५**
**क्र. सिडको/ नैना/ टीपीएस-०५/२०२२/**

ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ (महा. अधिनियम XXXVII, १९६६ ) (येथून पुढे उक्त अधिनियम असे निर्देशित करण्यात येईल), च्या कलम ४० च्या उपकलम (१) मधील खंड (ब) द्वारा प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभाग (नविवि) ने अधिसूचना क्रमांक टीपीएस-१७१२/४७५/प्र.क्र.-९८/१२/नवि-१२ दिनांक १० जानेवारी, २०१३ व वेळोवेळी झालेल्या सुधारणा अन्वये त्यात नमूद केल्याप्रमाणे, नवी मुंबई विमानतळ प्रभावित अधिसूचित क्षेत्र (नैना), (येथून पुढे उक्त क्षेत्र असे निर्देशित करण्यात येईल) साठी शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ महाराष्ट्र मर्यादित (महाराष्ट्र शासनाच्या मालकीची व नियंत्रणा खालील कंपनी) म्हणजे सिडकोची विशेष नियोजन प्राधिकरण (येथून पुढे वि.नि.प्रा.असे निर्देशित करण्यात येईल) म्हणून नेमणूक केली आहे.

आणि ज्याअर्थी महाराष्ट्र शासनाने अधिसूचना क्र. टीपीएस -१२१५/२४५/सीआर-३३२/२०१५/एस.एम./यूडी-१२, दिनांक २७ एप्रिल, २०१७ नुसार अधिनियमाच्या कलम ३१(१) नुसार नैनातील २३ गावांसाठी अंतरिम विकास आराखडा मंजूर केला आणि अधिसूचना क्र. टीपीएस. १२१५/२४५/प्र.क्र. ३३२/१६/ई.पी./नवि-१२ दिनांक ०१ मार्च, २०१९ अन्वये अंतरिम विकास आराखड्याचा वगळलेले भाग मंजूर केले आहेत.

आणि ज्याअर्थी महाराष्ट्र शासनाने अधिसूचना क्र. टीपीएस -१७१७/ एमआयएस २७५०/सीआर- ९१/ २०१९/यूडी -१२, दिनांक १६ सप्टेंबर, २०१९ नुसार नैनातील १५१ गावांसाठी विकास आराखडा मंजूर केला आहे.

आणि ज्याअर्थी, अधिनियमातील कलम ६० च्या उप-कलम (१) नुसार सिडकोच्या संचालक मंडळाने दिनांक ०७ जून २०१९ रोजीच्या ठराव क्र. १२१८९ अन्वये मौजे बोनशेत, भोकरपाडा (चिपळे) (भाग), देवद (भाग), मोहो (भाग), शिवकर (भाग), विचुंबे (भाग) आणि विहीघर (भाग) तालुका पनवेल, जिल्हा रायगड येथे नगररचना परीयोजना क्रमांक ५ (टीपीएस -५) करण्याकरिता त्याचा उद्देश घोषित केला आहे आणि उक्त अधिनियमाच्या कलम ६०(२) मध्ये नमूद तरतूदीनुसार टीपीएस - ५ करण्याच्या उद्देशाची घोषणा दिनांक २६ जून २०१९ रोजीच्या असाधारण अधिकृत महाराष्ट्र शासकीय राजपत्रात (भाग -२) आणि दिनांक १ जुलै, २०१९ व १० जुलै, २०१९ रोजीच्या स्थानिक वृत्तपत्रे रायगड नगरी आणि न्यूजबॅण्ड (Newsband) अनुक्रमे यात प्रकाशित करण्यात आली आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ६१(१) नुसार, नियोजन प्राधिकरणाने संचालक, नगर रचना, यांच्याशी सल्लामसलत करून, ज्या योजनेसाठी घोषणा करण्यात आली त्या क्षेत्रासाठी प्रारूप योजना तयार करुन घोषणेच्या तारखेपासून नऊ महिन्यांच्या आत किंवा वाढीव कालावधीत अधिकृत महाराष्ट्र शासकीय राजपत्रात नोटीस प्रकाशित करावयाची आहे.

आणि ज्याअर्थी, सह संचालक, नगर रचना, कोकण विभाग यांनी आदेश क्रमांक प्रा.न.र.यो.क्र. ५/नैना/कलम ६१(३)/मुदतवाढ/सहसंकोवि/२०५९ दिनांक ४ मार्च, २०२० अन्वये प्रारूप योजना बनवून प्रकाशित करण्यासाठी तीन महिन्यांचा म्हणजेच दि. २४ जून २०२० पर्यंतचा वाढीव कालावधी दिलेला आहे.

आणि ज्याअर्थी, टीपीएस नियम १९७४ च्या नियम क्र. ४(१) नुसार दिनांक ५ आणि ६ मार्च, २०२० रोजी संबंधित जमीन मालकांची सभा आयोजित करून आणि जमीन मालकांकडून मिळालेल्या सूचनांचा समावेश केल्यानंतर दि. २०.०३.२०२० रोजीच्या प्रस्तावान्वये टीपीएस-५ चा मसुदा उक्त अधिनियमाच्या कलम ६१(१) नुसार आणि टीपीएस नियम १९७४ च्या नियम क्रमांक ४(२) नुसार संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे कलम ५९(२) अन्वये मान्यता व कलम ६१ (१) प्रसिद्धीपूर्व सल्ला मसलतीसाठी पाठविण्यात आला.

आणि ज्याअर्थी, शासकीय राजपत्रात दिनांक ३१ ऑगस्ट २०२० रोजी प्रसिद्ध झालेल्या अध्यादेशानुसार व दिनांक १४ सप्टेंबर, २०२० रोजी उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर झाल्याप्रमाणे परियोजनेचा कालावधी गणना करताना टाळेबंदी उपाययोजनांच्या अंमलबजावणीचा कालावधी कलम १४८-अ अन्वये वगळण्यात आला आहे.

आणि ज्याअर्थी, संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य यांनी दि. ५ मार्च २०२१ रोजीच्या पत्र जा. क्र. नैना/नरयो क्र.५/प्र.क्र.७२/२०/टिपीव्ही ३/१३५२ अन्वये टीपीएस -५ बाबत सल्लामसलत दिली आहे.

आणि ज्याअर्थी, संचालक, नगर रचना यांनी सल्लामसलतीत सुचविल्याप्रमाणे आवश्यक ते बदल टीपीएस -५ मध्ये करण्यात आलेले आहेत.

आता, म्हणून उक्त अधिनियमातील कलम ६१(१) च्या तरतुदींनुसार, याद्वारे प्रारूप नगररचना परीयोजना क्रमांक ५ तयार करण्यात आली आहे असे जाहीर केले जाते आहे आणि ती याद्वारे प्रकाशित करण्यात येत आहे.

प्रारूप टीपीएस -५ योजनेची प्रत संबंधित विशेष नियंत्रण नियमावलीसह नैना कार्यालय, ८ वा मजला, टॉवर नं. १०, बेलापूर रेल्वे स्टेशन संकुल, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ येथे कार्यालयीन कामकाजाच्या सर्व दिवशी नागरीकांच्या अवलोकनार्थ खुली ठेवण्यात आली आहे. तसेच प्रारूप टीपीएस- ५ सिडकोचे संकेतस्थळ https://cidco.maharashtra.gov.in//naina येथे सुद्धा उपलब्ध केली आहे.

तरी आता, वरील सूचना महाराष्ट्र शासनाचे राजपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसाच्या आत, उक्त प्रसिद्ध केलेली टीपीएस -५ योजनेमुळे बाधा पोहचलेल्या कोणत्याही इसमाने उक्त योजनेसंबंधी कोणताही लेखी आक्षेप दस्तऐवजांसह मुख्य नियोजनकार, नैना, यांच्या नावे कार्यालयात सादर करावेत, म्हणजे उक्त योजना महामंडळातर्फे उक्त अधिनियमाच्या कलम ६८(१) च्या तरतुदींनुसार शासनास मंजुरीसाठी सादर करण्यापूर्वी, उक्त अधिनियमाच्या कलम ६७ अनुसार योग्य त्याप्रमाणे त्यांचा विचार करण्यात येईल व आवश्यक तर योजनेत फेरफार करण्यात येईल. याची कृपया नागरिकांनी नोंद घेऊन, सहकार्य करावे.

महामंडळाच्या संचालक मंडळाच्या आदेशानुसार.

स्थळ: नवी मुंबई
दिनांक : २५/०४/२०२२

**रवींद्रकुमार मानकर**
**मुख्य नियोजनकार (नैना)**

नोंदणीकृत कार्यालय: निर्मल, २ रा मजला, नरीमन पॉइंट, मुंबई ४०००२१

CIDCO/PR/043/2022-23

आयपीएलचा रनसंग्राम | आजचा सामना | दिल्ली वि. कोलकाता सायं. ७.३० वा., मुंबई

# राजस्थानचा ‘रॉयल’ विजय

## बंगळुरूच्या फलंदाजांची हाराकिरी



**पुणे : प्रतिनिधी**

आयपीएलमध्ये मंगळवारी झालेल्या सामन्यात राजस्थान रॉयल्सने दिलेले १४५ धावांचे लक्ष्य गाठताना रॉयल चॅलेंजस बंगळुरूची दमछाक झाली आणि त्यांचा २९ धावांनी पराभव झाला. राजस्थानचा युवा खेळाडू रियान परागने फलंदाजी आणि क्षेत्ररक्षण या दोन्ही विभागांत चमकदार कामगिरी केली, ज्यामुळे राजस्थानचा विजय सोपा झाला.

राजस्थानने दिलेले १४५ धावांचे माफक आव्हान गाठण्यासाठी बंगळुरू संघाकडून विराट कोहली आणि फाफ डू प्लेसिस ही जोडी सलामीला आली, मात्र विराटने निराशा केली. त्याने दहा चेंडूंमध्ये फक्त नऊ धावा केल्या, तर प्लेसिसने २३ धावा करीत संघाला लक्ष्यापर्यंत घेऊन जाण्याचा प्रयत्न केला. दोघेही चांगली कामगिरी करू न शकल्यामुळे दुसऱ्या विकेटसाठी आलेल्या रजत पाटीदारकडून अपेक्षा होत्या, मात्र मिळालेल्या संधीचे तो सोने करू शकला नाही. १६ धावांवर असताना तो त्रिफळाचित झाला. त्यानंतर आलेला ग्लेन मॅक्सवेल खातदेखील खोलू शकला नाही. चौथ्या विकेटसाठी शाहबाज अहमदने १७ धावा केल्या. सुयश प्रभुदेसाई फक्त दोनच धावा करू शकला.

सध्या फॉर्ममध्ये असलेला दिनेश कार्तिक सहा धावांवर धावबाद झाला. वनिंदू हसरंगानेही फक्त १८ धावा केल्या. कार्तिक आणि हसरंगा बाद झाल्यानंतर बंगळुरूच्या विजयाचा आशा मावळल्या. शेवटी बंगळुरुसमोर १२ चेंडूंमध्ये ३२ धावांचे अशक्य लक्ष्य होते. अपेक्षेप्रमाणे बंगळुरूचे शेवटच्या फळीतील फलंदाज हे लक्ष्य गाठू शकले नाहीत आणि या संघाचा २९ धावांनी पराभव झाला.

तत्पूर्वी बंगळुरूने नाणेफेक जिंकून सुरुवातीला गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. या वेळी फलंदाजीसाठी आलेल्या राजस्थान रॉयल्सची सुरुवात खराब झाली. सलामीला आलेले दोन्ही फलंदाजी स्वस्तात बाद झाले. जोस बटलरने आठ, तर देवदत्त पडिक्कलने सात धावा केल्या. तिसऱ्या विकेटसाठी आलेल्या रविचंद्रन अश्विननेही खास कामगिरी केली नाही. १७ धावा करून तो परतला. त्यानंतर मात्र तिसऱ्या विकेटसाठी आलेल्या संजू सॅमसनने संघाला सावरण्याचा प्रयत्न केला. त्याने २१ चेंडूंमध्ये २७ धावा केल्या, मात्र वनिंदू हसरंगाच्या चेंडूवर तो त्रिफळाचित झाला. डॅरिल मिशेलने १६ धावा केल्या.

राजस्थान संघामध्ये फलंदाजी विभागात रियान परागने दिमाखदार खेळ केला. पाचव्या विकेटसाठी आलेल्या परागने अर्धशतकी खेळी केली. त्याने ३१ चेंडूंमध्ये नाबाद ५६ धावा केल्या. त्यानंतर शेटवच्या फळीतील एकाही फलंदाजाला धावा करता आल्या नाहीत. शेमरॉन हेटमायर (३), ट्रेंट बोल्ट (५), प्रसिध कृष्णा (२) स्वस्तात बाद झाले. २० षटके संपेपर्यंत राजस्थानने १४४ धावा केल्या होत्या.

# जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेत कुर्डुस संघ विजेता



(छाया : धम्मशील सावंत)

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यातील आंबोले येथे झालेल्या जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेत मातृछाया कुर्डुस–अलिबाग संघाने प्रथम क्रमांक पटकाविला. गणेश दिवलांग–अलिबाग संघ उपविजेता ठरला.

स्वयंभू जय हनुमान चिवे संघाने तृतीय आणि धावीर रोहा संघाने चतुर्थ क्रमांक प्राप्त केला. सर्व विजेत्या संघाना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. स्पर्धेत उत्कृष्ट खेळाडू म्हणून समाधान मोरे, उत्कृष्ट चढाई अमीर धुमाळ, उत्कृष्ट पकड रोशन ठाकूर आणि पब्लिक हिरो नितीन शिर्के ठरला. त्यांनाही बक्षिसे देण्यात आली.

पारितोषिक वितरण समारंभास भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष राजेश मपारा, तहसीलदार दिलीप रायन्नावार, माजी सभापती साक्षी दिघे, संदेश शेवाळे, सुधीर मांढरे, बळीराम दळवी, धनंजय म्हस्के, कैलास दळवी, कृष्णा दळवी, विठू दळवी आदी उपस्थित होते.

कबड्डी हा तांबड्या मातीतील रांगडा, मर्दानी खेळ आहे. ग्रामीण भागातील उदयोन्मुख खेळाडूंना या स्पर्धेच्या माध्यमातून नेतृत्व गुणांना वाव मिळतो, असे सांगून राजेश मपारा म्हणाले की, खेळाच्या माध्यमातून गुणात्मक बदल घडवून आणून कुठल्याही खेळात स्वत:मधील गुणवत्ता सिद्ध कशी करता येईल, याकडे लक्ष देणे गरजेचे असून नेतृत्व कौशल्य जर जमले तर देशपातळीवर कबड्डीचे नेतृत्व आपल्याला करता येईल.

संदेश शेवाळे यांनी म्हटले की, कबड्डी खेळातून देशाचे नेतृत्व करणारे खेळाडू ग्रामीण भागातील असतात ही बाब अभिमानाची आहे. संधी मिळाल्यास तिचे सोने करण्याचे सामर्थ्य व ताकद या खेळाडूंमध्ये आहे. त्यांनी नेहमी खिलाडूवृत्ती ठेवून खेळाचे सादरीकरण करावे.

# उद्यापासून आरसीसीएल रंगणार

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड क्रिकेट आणि वेल्फेअर असोसिएशनतर्फे उरणमधील जेएनपीए मैदानावर रायगड चॅम्पियन्स क्रिकेट लीग (आरसीसीएल) ट्वेन्टी–२० क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या मान्यतेने खेळविण्यात येणाऱ्या या स्पर्धेत जिल्ह्यातील आठ संघ सहभागी झाले असून स्पर्धेचे उद्घाटन शुक्रवारी (दि. २९) होणार आहे.

या स्पर्धेसाठी जिल्ह्यातील २८५ क्रिकेटपटूंनी नोंदणी केली होती. त्यातून १६० खेळाडूंची निवड करण्यात आली. या खेळाडूंमधून आठ संघ तयार करण्यात आले आहेत. प्रत्येक संघात २० खेळाडू असतील. आयपीएलच्या धर्तीवर ही स्पर्धा खेळविण्यात येणार आहे.

रणजीपटू योगेश पवार, भरत सोलंकी यांच्यासह अनेक दिग्गज खेळाडू या स्पर्धेत खेळणार आहेत. १९ वर्षाखालील दोन, २५ वर्षाखालील तीन व खुल्या गटातील सहा असे ११ खेळाडू प्रत्येक संघात असतील.

स्पर्धा २२ दिवस खेळली जाणार आहे. न्युट्रल अंपयार, मॅचरेफ्री, थर्ड अंपयार, खेळाडूंसाठी रंगित गणवेश, स्नॅक्स, पीगपॉंग एंटरटेमेंटकडून सामन्यांचे प्रक्षेपण हे स्पर्धेचे वैशिष्ट्य आहे. रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष चंद्रकांत मते, कार्यध्यक्ष प्रदीप नाईक तसेच इतर पदाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली अरसीसीएलचे सर्व सदस्य स्पर्धा यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेत आहेत.

# पार्श्व वूमन्स सामाजिक संस्थेच्या क्रिकेट स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद



> कोणता संघ जिंकला हे महत्त्वाचे नसून विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर खेळाचा आनंद दिसला हेच आमच्यासाठी महत्त्वाचे होते.
>
> –बसंती जैन, पार्श्व वूमन्स सामाजिक संस्था, पनवेल

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलमधील महिलांनी एकत्र येऊन स्थापन केलेल्या पार्श्व वूमन्स सामाजिक संस्थेद्वारे प्रथमच आयोजित गरीब व गरजू विद्यार्थ्यांसाठीच्या क्रिकेट स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

पार्श्व वूमन्स सामाजिक संस्थेने गोरगरीब शालेय विद्यार्थ्यांसाठी आयोजिलेल्या क्रिकेट स्पर्धेत पनवेल परिसरातील जि. प. शाळा वडघर, चिंचपाडा, मोठे ओवळे, वडघर कोपरमधील एकूण ३२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या मुलांसाठी संस्थेने शूज आणि टी–शर्ट मोफत दिले. एवढेच नव्हे तर मुलांसाठी टर्फ आणि जेवणापासून एनर्जी ड्रिंक्सही दिले. क्रिकेटचे टर्फ हे कॅप क्लब पनवेलतर्फे मनोज ढेडीया व मनू सचदेव यांनी मोफत उपलब्ध करून दिले होते.

स्पर्धेसाठी बसंती जैन, प्रतिभा जैन, निशा जैन, नेहा गांधी, भूमिका परमार, रीना परमार, कल्पना जैन, प्रिती मुनोथ, पायल कोठारी, आकांक्षा बांठिया, धनश्री गुंडेचा, नीलम सोमाणी, मनाली परमार, विमला जैन, शीतल ठक्कर, पूजा जैन उपस्थित होत्या. त्यांनी मुलांचा उत्साह वाढविला.

स्पर्धा यशस्वी करण्यासाठी संजय जैन व यश जैन यांनी मेहनत घेतली. या मुलांना प्रोत्साहन देण्यासाठी उद्योजक महावीर कोठारी, कल्पना कोठारी, नीरज कोठारी तसेच पत्रकार गणेश कोळी, संजय कदम, निलेश सोनावणे, नंदू धोत्रे, लक्ष्मण ठाकूर, चेतन पोपेटा आदी उपस्थित होते.

# केपीएल शुटींगबॉल स्पर्धेत वाघ्रण संघ जेतेपदाचा मानकरी



**अलिबाग : प्रतिनिधी**

हाशिवरे येथे झालेल्या खारेपाट प्रीमियर लीग शुटींगबॉल स्पर्धेत वाघ्रणच्या परिविहान वॉरियर्स संघाने विजेतेपद पटकाविले. सुफला स्ट्रायकर्स संघ उपविजेता ठरला, तर तृतीय क्रमांक देवेंद्र स्पोर्ट्स मांडवखार आणि चतुर्थ क्रमांक लिबर्टी संघाने मिळविला. विजेत्यांना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

स्पर्धेत बेस्ट शुटर राजेश पाटील, बेस्ट नेटमन कपिल ठाकूर, बेस्ट डिफेंन्स अनिकेत पाटील, प्लेअर ऑफ द प्लेसमेंट सामनावीर म्हणून रोहित पाटील याची निवड करण्यात आली. या सर्वांना ही बक्षीस देण्यात आले.

पारितोषिक वितरण समारंभास अमित नाईक, खारेपाट शुटींगबॉल पदाधिकारी शंकर मोकल, उपाध्यक्ष सुनील म्हात्रे, जिल्हा शुटींगबॉल खेळाडू संघटना, केपीएल कमिटी पदाधिकारी, खारेपाटातील आजी माजी सरपंच, उपसरपंच, सदस्य आणि कबड्डीप्रेमी उपस्थित होते.

# अलिबागच्या झिराडमध्ये तीन दिवस रंगणार कबड्डी स्पर्धा

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील झिराड येथे साई क्रीडा मंडळ, महिला मंडळाच्या वतीने जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. २८ ते ३० एप्रिलपर्यंत तीन दिवस येथील मैदानावर कबड्डीचे सामने रंगणार आहेत. प्रो कबड्डीच्या धर्तीवर आयोजित या कबड्डी स्पर्धेचा आनंद प्रत्यक्षात व घरबसल्या ऑनलाइनद्वारेही अलिबागकरांसह रायगडकरांना घेता येणार आहे.

कबड्डी स्पर्धेत जिल्हास्तरीय महिला गट, पुरुष गट, अलिबाग–रेवस पंचक्रोशी गट, सागरगड पंचक्रोशी गट व बामणगाव पंचक्रोशी पुरुष गट असे वेगवेगळ्या गटांमध्ये सामने होणार आहे. या स्पर्धेमध्ये हजारो रुपयांची बक्षिसे ठेवण्यात आली आहेत तसेच उत्कृष्ट पकड, उत्कृष्ट चढाई, सर्वोत्कृष्ट खेळाडू, व पब्लिक हिरो या खेळाडूंना सन्मानित केले जाणार आहे. पहिल्या दिवशी २८ एप्रिल रोजी ३२ संघ, २९ एप्रिल रोजी ४८ संघ व शेवटच्या दिवशी ३० एप्रिल रोजी ३२ संघ खेळणार आहेत.

स्पर्धेसाठी दोन मैदाने तयार करण्यात आली सुमारे सहा हजार प्रेक्षक बसून एकाच वेळी स्पर्धा बघतील अशी व्यवस्था करण्यात आली आहे. ही स्पर्धा संध्याकाळी ५नंतर सुरू केली जाणार आहे. त्यामुळे विद्युत प्रकाशझोतात कबड्डीचा थरार प्रेक्षकांना बघता येणार आहे.

# मी अयशस्वी व्हावे अशी अनेकांची इच्छा होती –रवी शास्त्री



**लंडन : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट संघाचे माजी प्रशिक्षक रवी शास्त्री यांनी एक खळबळजनक दावा केला आहे. मी अयशस्वी व्हावे अशी अनेकांची इच्छा होती. त्यामुळे इतरांच्या मताला फारसे महत्त्व देणे मी थांबवले, असे त्यांनी म्हटले आहे.

शास्त्री यांची २०१७ मध्ये भारताच्या मुख्य प्रशिक्षकपदी नेमणूक करण्यात आली होती. त्यांनी हे पद गेल्या वर्षीच्या ट्वेन्टी–२० विश्वचषकापर्यंत सांभाळले. त्यांच्या मार्गदर्शनात भारतीय संघ कसोटी क्रमवारीत अग्रस्थानी होता तसेच भारताने जागतिक कसोटी अजिंक्यपद क्रिकेट स्पर्धेच्या पहिल्या पर्वाची अंतिम फेरी गाठली. भारताने एकदिवसीय आणि ट्वेन्टी–२० क्रिकेटमध्येही सातत्यपूर्ण कामगिरी केली, मात्र अनेकांना माझे यश रूचले नाही, असे परखड मत शास्त्री यांनी इंग्लंडमधील एका वृत्तपत्राला दिलेल्या मुलाखतीत व्यक्त केले.

‘भारतामध्ये तुम्ही एखाद्या क्षेत्रात अयशस्वी व्हावे अशी अनेकांची इच्छा असते. मी राष्ट्रीय क्रिकेट संघाचा प्रशिक्षक होण्यासाठी आवश्यक प्रशिक्षण घेतलेले नाही. त्यामुळे मी यशस्वी झालो हे अनेकांना रूचले नाही, मात्र मी इतरांच्या मतांकडे दुर्लक्ष करण्यास शिकलो. त्यांना महत्त्व देणे मी थांबवले,’ असे शास्त्री म्हणाले.

‘भारतीय संघ परदेशात यशस्वी ठरावा हे प्रशिक्षक म्हणून माझे मुख्य लक्ष्य होते. सर्व खेळाडूंनी एकत्रित येऊन सांघिक कामगिरी करणे गरजेचे असून कोणत्याही खेळाडूला वेगळी, खास वागणूक मिळणार नसल्याचे मी प्रशिक्षकपद स्वीकारल्यावर स्पष्ट केले होते. खेळाडूंना तंदुरुस्तीवर विशेष लक्ष देण्याची मी सूचना केली तसेच खेळाडूंना आक्रमक शैलीत आणि निर्भीडपणे खेळण्यास सांगितले. विशेषत: ऑस्ट्रेलियन खेळाडूंनी तुम्हाला शिवीगाळ केल्यास तुम्हीही मागे हटू नका, असे मी आमच्या खेळाडूंना बजावले होते. या गोष्टींमुळेच आमच्या संघाने यशस्वी कामगिरी केली,’ असेही शास्त्री यांनी नमूद केले.

# जोकोव्हिचचा विम्बल्डनमध्ये खेळण्याचा मार्ग मोकळा



**लंडन : वृत्तसंस्था**

सर्बियाचा तारांकित टेनिसपटू नोव्हाक जोकोव्हिचचा यंदाच्या विम्बल्डनमध्ये खेळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. कोरोना प्रतिबंधात्मक लस न घेतलेल्या जोकोव्हिचला ऑस्ट्रेलियन खुल्या टेनिस स्पर्धेत खेळता आले नाही, मात्र ब्रिटनमध्ये प्रवेश करण्यासाठी लसीकरण सक्तीचा नियम रद्द करण्यात आल्याने आता गतविजेत्या जोकोव्हिचला विम्बल्डनमध्ये खेळता येणार आहे.

यंदाच्या विम्बल्डनला २७ जूनपासून प्रारंभ होणार आहे. या संदर्भात ऑल इंग्लंड क्लबच्या मुख्य कार्यकारी अधिकारी सॅली बोल्टन यांनी सांगितले की, विम्बल्डनमध्ये सहभागी होणाऱ्या खेळाडूंना लस घेण्याचे आमचे आवाहन असेल, मात्र आम्ही लसीकरणाची सक्ती करणार नाही.

जागतिक क्रमवारीतील अग्रस्थानावरील जोकोव्हिचला ऑस्ट्रेलियन खुल्या स्पर्धे प्रमाणेच अमेरिकेत झालेल्या इंडियन वेल्स आणि मियामी खुल्या स्पर्धेलाही मुकावे लागले होते. ऑस्ट्रेलिया आणि अमेरिकेत परदेशी नागरिकांना लससक्ती करण्यात आली होती, मात्र दोन वेळा कोरोनाची बाधा झालेल्या जोकोव्हिचने लस घेण्यास नकार दिला होता.

# हर्षल पटेलचे लाजीरवाणे कृत्य; सामन्यानंतर परागशी हस्तांदोलन टाळले

**पुणे : प्रतिनिधी**

आयपीएलमध्ये मंगळवारी झालेल्या सामन्यादरम्यान राजस्थान रॉयल्सचा रियान पराग आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा हर्षल पटेल हे एकमेकांशी भिडताना दिसले. त्यांचा हा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

राजस्थानच्या डावातील शेवटच्या षटकात बंगळुरूचा गोलंदाज हर्षल पटेलच्या शेवटच्या षटकात रियान परागने एक चौकार आणि दोन षटकारांसह १८ धावा काढल्या. त्याने ३१ चेंडूंत ५६ धावांची नाबाद खेळी खेळली. राजस्थानचा डाव संपल्यानंतर पराग डगआऊटकडे जात असताना पटेल त्याला काहीतरी बोलला. यावरून त्यांच्यात बाचाबाची झाली. सामना संपल्यानंतर जेव्हा दोन्ही संघाचे खेळाडू हातात हात देत होते, तेव्हा परागने पटेलकडे हस्तांदोलन करण्यासाठी हात पुढे केला, पण पटेलने हस्तांदोलन केले नाही.

# वानखेडे स्टेडियमवर झळकले कोल्हापुरी फेटे

## धोनीसाठी केले चिअर




**मुंबई : प्रतिनिधी**

पंजाब किंग्ज आणि चेन्नई सुपर किंग्ज यांच्यातील लढत चांगलीच अटीतटीची ठरली. विजय आणि पराभव या व्यतीरिक्त हा सामना अनेक कारणांमुळे संस्मरणीय ठरला. या सामन्यादरम्यान महाराष्ट्रीतील कोल्हापूर जिल्हादेखील चांगलाच चर्चेचा विषय ठरला.

या सामन्यात चेन्नई सुपर किंग्जचा ११ धावांनी पराभव झाला असला तरी पिवळी जर्सी परिधान करून चेन्नईचे चाहते महेंद्रसिंह धोनीचा जयजयकार करीत होते. या वेळी वानखेडे स्टेडियमवर धोनीचे वेड असलेले कोल्हापूरचे जबरा फॅनही होते. यामध्ये एका कोल्हापुरी फॅनने धोनीबद्दल प्रेम व्यक्त करणारे खास पोस्टर आपल्या हातात घेतले होते.

पिवळी जर्सी आणि पिवळ्या रंगाचा फेटा परिधान करून मूळचा कोल्हापूरचा असलेला एक प्रेक्षक धोनीसाठी चिअर करत होता. त्याच्या हातात विशेष पोस्टर होते. धोनीच्या पेन्सिल स्केचसोबत त्याच्याविषयी प्रेम व्यक्त करणारा मजकूर या पोस्टरवर लिहिलेला होता. विशेष म्हणजे कोल्हापूरचेही नाव यावर विशेषत्वाने लिहिलेले होते. प्रिय धोनी कोल्हापूरमधून खूप प्रेम अशा आशयाचा मजकूर या पोस्टरवर लिहिण्यात आला होता. खास कोल्हापूरमधून आलेल्या धोनीच्या या चाहत्याचे फोटो सध्या सोशल मीडियावर चांगलेच व्हायरल झाले आहेत.

## आशिया बॅडमिंटन स्पर्धा

# सात्त्विक-चिराग दुसऱ्या फेरीत

**मनिला : वृत्तसंस्था**

भारताच्या सात्त्विकसाइराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी या आघाडीच्या जोडीने आशिया अजिंक्यपद बॅडमिंटन स्पर्धेत विजयी सलामी दिली. मिश्र दुहेरीत मात्र भारताच्या इशान भटनागर आणि तनीषा क्रॅस्टो जोडीला दुसरी फेरी गाठण्यात यश आले.

जागतिक क्रमवारीत सातव्या स्थानी असलेल्या सात्त्विक–चिराग जोडीला या स्पर्धेत तिसरे मानांकन लाभले आहे. त्यांनी पहिल्या फेरीच्या सामन्यात अपिलूक गेटराहोंग आणि नॅट्चानोन तुलामोक या थायलंडच्या जोडीला २१–१३, २१–९ अशी सहज धूळ चारली. भारतीय जोडीने २७ मिनिटांत हा विजय मिळवला. पुढच्या फेरीत सात्त्विक–चिराग जोडीचा सामना जपानच्या अकिरो कोगा आणि तैची साइतो जोडीशी होणार आहे.

मिश्र दुहेरीत भारताच्या इशान भटनागर आणि तनीषा क्रॅस्टो जोडीला दुसरी फेरी गाठण्यात यश आले. भारतीय जोडीने हाँगकाँगच्या लॉ चुक हिम आणि येउंग एनजी टिंग जोडीला २१–१५, २१–१७ असे सरळ गेममध्ये पराभूत केले. कृष्ण प्रसाद गारगा आणि विष्णूवर्धन गौड पंजाला जोडीचे आव्हानही संपुष्टात आले. पुरुष दुहेरीच्या पहिल्या फेरीत त्यांना कांग मिनह्युक आणि किम वोन्हो जोडीकडून १०–२१, २१–१९, १६–२१ असे पराभूत व्हावे लागले तसेच एमआर अर्जुन आणि ध्रुव कपिला, तर वेंकट गौरव प्रसाद आणि जूही देवांगनलाही पराभव पत्करावा लागला.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com